शनिवार, ३० जुलै २०२२ ◆ वर्ष १५ ◆ अंक १३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

नवी मुंबईत २५ प्रभाग ओबीसींसाठी आरक्षित/२
खालापूरजवळ मिनीबस उलटून १२ प्रवासी जखमी/७
जागतिक शोतोकॉन स्पर्धेसाठी पनवेलच्या उर्वीची निवड/८

## भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय बुलियन एक्स्चेंजचे उद्घाटन



**गांधीनगर :** भारतीय ज्वेलर्सना परदेशातून सोने आयात करणे सोपे होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २९) भारतातील पहिले आंतरराष्ट्रीय बुलियन एक्स्चेंज सुरू करण्यात आले. गुजरातमधील गांधीनगरजवळील इंटरनॅशनल फायनान्स टेक-सिटी येथे हे एक्सचेंज सुरू झाले आहे. हे एक्सचेंज प्रत्यक्ष सोने आणि चांदी विकेल. शांघाय गोल्ड एक्सचेंज आणि बोर्सा इस्तंबूलच्या धर्तीवर या एक्स्चेंजची स्थापना करण्यात आली आहे, ज्यामुळे भारताला सराफा क्षेत्रीय केंद्र म्हणून मजबूत स्थान मिळेल. बुलियन म्हणजे उच्च शुद्धतेचे फिजिकल सोने आणि चांदी, जे बार, इनगॉट्स किंवा नाण्यांच्या स्वरूपात ठेवलेले असते. मध्यवर्ती बँकांद्वारे किंवा संस्थात्मक गुंतवणूकदारांद्वारे ते स्टोरेज म्हणून ठेवले जाते.

# उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का

## पुतण्या निहारचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पाठिंबा

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा नातू आणि उद्धव ठाकरे यांचे पुतणे निहार ठाकरे यांनी शुक्रवारी (दि. २९) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत त्यांना आपला पाठिंबा दिला. उद्धव ठाकरे हे शिवसैनिकांकडून निष्ठेची शपथपत्रे घेत असताना थेट ठाकरे घराण्यातील सदस्यच मुख्यमंत्री शिंदे गटात दाखल झाला आहे. उद्धव यांना हा घरातच धक्का असल्याचे मानले जात आहे.



निहार हे स्व. बिंदुमाधव ठाकरे यांचे चिरंजीव आणि भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांचे जावई आहेत. या वेळी त्यांच्यासोबत भारतीय कामगार सेनेचे पदाधिकारी किरण पावसकर हेही उपस्थित होते. नुकतीच स्मिता ठाकरे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली होती.

### मुख्यमंत्र्यांनी रुग्णालयात घेतली आप्पासाहेब धर्माधिकारींची भेट

ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना रुटीन चेकअपसाठी मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गुरू आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी तातडीने आप्पासाहेबांची लीलावती रुग्णालयात जाऊन भेट घेतली. महाराष्ट्रभूषण आप्पासाहेब धर्माधिकारी हे डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे प्रमुख असून अलिबाग तालुक्यातील रेवदंडा या ठिकाणी वास्तव्यास आहेत. राज्यातील विविध पक्षांतील अनेक नेते धर्माधिकारी कुटुंबाला मानतात.

# मुंबई मनपा ओबीसी सोडतीत बड्या नेत्यांचे प्रभाग आरक्षित

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि. २९) इतर मागासवर्गीय प्रवर्गाची (ओबीसी) आरक्षण सोडत काढण्यात आली. यात अनेक दिग्गज नगरसेवकांना धक्का बसला आहे.



निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी एससी, एसटी प्रवर्गाचे यापूर्वी घोषित झालेले आरक्षण वगळता २३६ पैकी २१९ प्रभागांची आरक्षण सोडत काढण्यात आली. वांद्रे येथील बालगंधर्व रंगमंदिरच्या सभागृहात काढण्यात आलेल्या या सोडतीमध्ये इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी ६३ प्रभाग आरक्षित करण्यात आले असून त्यापैकी ३२ प्रभाग इतर मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झाले आहेत. प्रभाग आरक्षित झाल्यामुळे काही माजी नगरसेवकांना आगामी निवडणूक लढविण्यासाठी अन्य प्रभागाचा शोध घ्यावा लागणार आहे.

मुंबई महापालिकेतील विरोधी पक्षनेते रवी राजा यांचा वॉर्ड महिला आरक्षित झाला आहे. यापूर्वी ३१ मे रोजी काढण्यात आलेल्या प्रभाग आरक्षण सोडतीतही हा प्रभाग आरक्षित झाला होता.

याशिवाय शिवसेनेच्या माजी सभागृह नेत्या तृष्णा विश्वासराव, राष्ट्रवादीच्या गटनेत्या राखी जाधव आणि माजी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांचा वॉर्ड ओबीसी आरक्षित झाला आहे. त्यामुळे त्यांना दुसरे वॉर्ड शोधावे लागतील.

# राष्ट्रपतींचा अपमान : काँग्रेसविरोधात भाजप आक्रमक

## देशाची माफी मागून प्रायश्चित्त घ्या -अश्विनी पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसभेतील काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी यांनी नवनिर्वाचित राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याविषयी अत्यंत असंस्कृत आणि असभ्य टिप्पणी करून काँग्रेसच्या हीन संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. चौधरी यांच्या या वक्तव्यास काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांनी प्रोत्साहन दिल्याने देशातील महिलांचा, समृद्ध परंपरा असलेल्या आदिवासी समाजाचा आणि राष्ट्रपतिपदाचा अपमान झाला आहे. या उद्दामपणाबद्दल सोनिया गांधी, अधीर रंजन चौधरी आणि सर्व काँग्रेसजनांनी देशाची माफी मागून प्रायश्चित्त घेतले पाहिजे, अशी मागणी भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी केली.

काँग्रेसकडून जोपर्यंत माफी मागितली जात नाही तोपर्यंत भाजपतर्फे जागोजागी काँग्रेसच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा पाटील यांनी दिला. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून सुरू असलेल्या सोनिया गांधींच्या ईडी चौकशीस विरोध करण्यासाठी रस्त्यावर उतरून कायदा-सुव्यवस्थेस बट्टा लावणाऱ्या काँग्रेसजनांनी देशाच्या राष्ट्रपतींचा अपमान होत असताना मौन का बाळगले, असा सवालही त्यांनी केला.



संसद अधिवेशनादरम्यान लोकसभेत गुरुवारी काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा उल्लेख राष्ट्रपत्नी असा केला. जाणीवपूर्वक अपमान करण्याच्या उद्देशाने चौधरी यांच्याकडून हा उल्लेख होत असताना सोनिया गांधी यांनी मात्र त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून वर्णवर्चस्ववादी मानसिकतेचे दर्शन घडविले आहे.

सभागृहाच्या शिस्तीला आणि सभ्यतेच्या संकेतास बट्टा लावण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून वारंवार होत असतो. चौधरी यांच्या राष्ट्रपतींविषयीच्या या उद्दाम उल्लेखामुळे सभागृहाचा, राष्ट्रपतिपदाचा आणि देशाचा अपमान झाला आहे, अशी घणाघाती टीका अश्विनी पाटील यांनी केली आहे. राष्ट्रपती मुर्मू यांचा अपमान करण्यासाठी सोनिया गांधी यांनी जाणीवपूर्वक चौधरी यांना फूस लावली, असा आरोपही त्यांनी केला. सोनिया गांधी या स्वतः महिला असूनही त्यांनी महिलेविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या चौधरी यांना समज दिली नाही. काँग्रेसची ही आदिवासीविरोधी व महिलाविरोधी मानसिकता उघड झाल्याने आता माफीखेरीज पर्याय नाही, असेही पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

# 'त्या' काँग्रेस नेत्यांना न्यायालयाचा दणका

## २४ तासांत ट्वीट डिलीट करण्याचे आदेश



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय मंत्री, भाजप नेत्या स्मृती इराणी आणि त्यांच्या मुलीवर करण्यात आलेल्या आरोपप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने काँग्रेस नेते जयराम रमेश, पवन खेरा आणि नेट्टा डिसूजा यांना फटकारले आहे. हायकोर्टाने या काँग्रेस नेत्यांना संबंधित ट्वीट २४ तासांमध्ये डिलीट करण्याचा आदेश दिला आहे.

गोव्यातील एक रेस्टॉरंट स्मृती इराणी यांच्या मुलीच्या मालकीचा असून यामध्ये बेकायदेशीरपणे मद्यालय चालवले जात असल्याचा आरोप तीन काँग्रेस नेत्यांनी केला होता. या विरोधात इराणी यांनी अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला. या प्रकरणी कोर्टाने काँग्रेसच्या तिन्ही नेत्यांना समन्स बजावत १८ ऑगस्टला अब्रुनुकसानीच्या खटल्यासाठी हजर राहण्याचेही निर्देश दिलेत.

## निवडक

### आसाममध्ये 'अल कायदा'चे ११ दहशतवादी पकडले

**दिसपूर :** आसाम पोलिसांनी दहशतवाद्यांविरोधात मोठी कारवाई करीत ११ जणांना ताब्यात घेतले आहे. अल-कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट आणि अन्सारुल्ला बांग्ला या दहशतवादी संघटनांशी त्यांचा संबंध असल्याचा आरोप आहे. त्यांच्याकडून इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि कागदपत्रे जप्त करण्यात आली आहे. त्यांच्यापैकी एकाला मोरीगाव येथून ताब्यात घेण्यात आले असून तो मदरसा चालवित असल्याचे समोर आले आहे.

### खासदार नवनीत राणांच्या जीवाला धोका; पत्राने खळबळ

**अमरावती :** खासदार नवनीत राणा यांच्या जीवाला धोका असल्याचे पत्र आल्याने खळबळ उडाली आहे. राजस्थानच्या सीमेवरून आलेले काही लोक आपला पाठलाग करीत असल्याची माहिती असून आपण सांभाळून राहावे, असे या पत्रात खासदार राणा यांचा हितचिंतक असणाऱ्या कथित अल्पसंख्याक व्यक्तीने म्हटले आहे.

# गावठी दारूच्या धंद्यांना आळा घाला

## मुरूडमधील आदिवासी महिलांचे तहसीलदारांना निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीत बेलीवाडी आदिवासी भागात गावठी दारूचे धंदे तेजीत असून त्याचा नाहक त्रास तेथील आदिवासी महिलांना सहन करावा लागत आहे. घरातील कर्ते पुरुष दारूच्या व्यसनाच्या आहारी गेले असल्याने दारूचे धंदे बंद करावेत, अशी मागणी बेलीवाडी परिसरातील महिलांनी निवेदनाद्वारे तहसीलदार रोहन शिंदे यांच्याकडे केली आहे.

तहसीलदारांना दिलेल्या या निवेदनात नमूद केले आहे की दारूच्या धंद्यांमुळे सर्व पुरुष व वयात आलेली मुले या व्यसनात गुंतली आहेत. दारू पिऊन ते घरच्या मंडळींना मारझोड करतात. व्यसनापायी कामधंदा टाळतात. याचा संपूर्ण त्रास परिवाराला सहन करावा लागत आहे.

याबाबत तहसीलदार रोहन शिंदे यांनी सांगितले की, या प्रकरणी मुरूड पोलीस ठाण्याला पत्र देण्यात आले असून परिस्थिती तपासून योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.




(छाया : संजय करडे)

# मुंबईत घरामध्ये आढळले चौघांचे मृतदेह

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या गोवंडी येथील शिवाजीनगर परिसरात चार जणांचे मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. पती, पत्नी आणि दोन मुलांचे हे मृतदेह असून त्यांनी आत्महत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

गोवंडीतील शिवाजीनगर येथील इंदिरानगर झोपडपट्टी परिसरात शुक्रवारी (दि. २९) सकाळी खान कुटुंबातील चौघांचे मृतदेह आढळले. स्थानिकांनी घटनेची माहिती पोलिसांना देताच पथक घटनास्थळी पोहचले. शकील खान (वय ३४), पत्नी रजिया खान (वय २५), मुलगा सरफराज (वय ७), मुलगी अतिसा (वय ३) अशी या मृतांची नावे आहेत. पती-पत्नीने आत्महत्या करण्यापूर्वी मुलांची हत्या केल्याचा संशय आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.



**कामोठे : येथील सेक्टर १४मध्ये जी. जी. गोल्ड हा ज्वेलर्सचा व्यवसाय विनायक गायकवाड आणि सतिश गिड्डे यांनी सुरू केला आहे. या ठिकाणी भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (वृत्त पान ३ वर..)

## राज्यात दहीहंडीला सार्वजनिक सुटी होणार जाहीर

**मुंबई :** मुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारल्यापासून एकनाथ शिंदे यांनी अनेक निर्णयांचा सपाटा लावलाय. अवघ्या काही दिवसांमध्ये मुख्यमंत्र्यांनी ५००पेक्षा अधिक जीआर काढले आहेत. यावरुन त्यांच्या कामाचा वेग समजून येतो. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी आता आणखी एक मोठा निर्णय घेतलाय. राज्यात दहीहंडीला सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात येणार आहे. तशा या मागणीचे पत्र आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना दिले होते. यानंतर आता मुख्यमंत्री १९ ऑगस्टला सार्वजनिक सुटी जाहीर करणार आहेत. स्वतः त्यांनीच प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली.

# आदित्य ठाकरेंचा वाहून गेलेला पूल मुख्यमंत्री शिंदेंनी पुन्हा उभारला

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमधील तास नदीवरील शेंद्रीपाडा येथे तत्कालीन पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी पाहणी करीत लोखंडी पूल बांधला होता, मात्र यंदाच्या पावसाळ्यातील पहिल्याच पुरात हा पूल वाहून गेला असून मुख्यमंत्री शिंदे सरकारने दखल घेत हा पूल नव्याने बांधला आहे.



नाशिक जिल्ह्यातील सावरपाडा येथील आदिवासी लोकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत होती. दुरून पाणी आणण्यासाठी दरीच्या एका बाजूवरून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी लाकडी बल्लीचा वापर केला जात होता. याबाबतचे वृत्त विविध वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर तत्कालीन सरकारने या नदीवर पूल बांधून दिला, पण हा पूल पहिल्याच पावसाच्या पुरात वाहून गेला. त्यामुळे शिंदे सरकारने कार्यवाही करीत हा पूल नव्याने उभारला आहे.

शेंद्रीपाडा येथील लोखंडी पूल वाहून गेल्याने ठाकरे सरकारवर लोकांनी निशाणा साधला होता. नव्या शिंदे सरकारने याची दखल घेत नाशिक जिल्हा प्रशासनाला पाहणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर शिंदे यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेळ चिवटे यांनी या ठिकाणची पाहणी केली. त्यानंतर आता दुसरा लोखंडी पूल उभारण्यात आला आहे.

# मासेमारीसाठी बंदरात सज्जता

## मच्छीमार बोटींवर खलाशांची लगबग; कामांना वेग

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

दोन महिन्यांच्या बंदीनंतर १ ऑगस्टपासून पुन्हा एकदा मासेमारीला सुरुवात होणार आहे. त्यासाठी अवघ्या दोन दिवसांचा अवधी उरल्याने बंदरांमध्ये मच्छीमारांची विविध कामांसाठी लगबग सुरू झाली आहे.



पावसाळ्याच्या सुरुवातीचा काळ हा माशांच्या प्रजननाचा असल्याने १ जूनपासून पुढील ६० दिवस म्हणजेच ३१ जुलैपर्यंत शासन आदेशान्वये मासेमारी बंद असते. बंदीनंतर १ ऑगस्टपासून पुन्हा मच्छीमार बांधव मासेमारीला सुरुवात करतात. खवळलेला समुद्र ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून शांत होतो. त्यानंतर खोल समुद्रातील मासेमारी नव्या जोमाने सुरू होते. विशेषतः नारळी पौर्णिमेनंतर मासेमारीसाठी पोषक वातावरण असते. या पार्श्वभूमीवर कोळी बांधव सज्ज होत आहेत.

सध्या सर्व बंदरांत शेकडो मासेमारी ट्रॉलर्सवर खलाशांची लगबग सुरू आहे. जाळी व बोटींची डागडुजी, रंगरंगोटी आणि इतर तत्सम कामांना वेग आला आहे. त्याचबरोबर मच्छीमार संस्थांकडून रांगा लावून डिझेल खरेदीऐवजी खुल्या बाजारातून डिझेल खरेदी करून मासेमारीला प्रारंभ करण्याच्या तयारीत मच्छीमार आहेत.



# मालमत्ता कराचा भरणा करा आणि शास्तीवर ७५ टक्के सवलत मिळवा!

### पनवेल मनपातर्फे आवाहन



**दैनिक कर संकलन**

- २६ जुलै : ५९ लाख
- २७ जुलै : १ कोटी ४३ लाख
- २८ जुलै : १ कोटी ३५ लाख

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेने सिडको हद्दीतील मालमत्ताधारकांना ३१ जुलैपर्यंत शास्तीवरती ७५ टक्के सवलत देऊ केली आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी अखेरचे दोन दिवस राहिले असून नागरिकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

या आधीही महापालिकेने मालमत्ता करामध्ये भरघोस सवलत दिली होती. नागरिकांनी शास्तीवरील ७५ टक्के सवलत मिळविण्यासाठी ३१ जुलैपर्यंत आपला कर भरणा करावा. महापालिकेच्या वतीने मालमत्ता कर ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता पीएमसी टॅक्स ॲप सुरू केले आहे. त्याचप्रमाणे ऑनलाईन मालमत्ता कर भरण्यासाठी https//:panvelmc.orgकिंवा www.panvelmc.org या संकेतस्थळावर भेट देण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात येत आहे.

मालमत्ता कर भरण्यासाठी ३० जुलैला शनिवार आणि ३१ जुलैला रविवारी प्रभाग समिती आणि मुख्यालयातील मालमत्ता कर विभागाचे कार्यालय सुरू ठेवण्यात येणार आहेत.

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील तळोजा औद्योगिक वसाहत, कळंबोली स्टील बाजार, पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ताधारकांना मालमत्ता करांमध्ये महापालिकेने ३१ जुलैपर्यंत १० टक्के सवलत दिली आहे. या कार्यक्षेत्रातील नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढवलेली सदस्य संख्या रद्द करा

## भाजप प्रदेश सरचिटणीस आ. बावनकुळे यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थातील नियमबाह्य पद्धतीने वाढवलेली सदस्यसंख्या त्वरीत रद्द करावी अशा मागणीचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केल्याची माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि. २९) दिली.



भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आमदार बावनकुळे बोलत होते. भाजप प्रदेश उपाध्यक्ष सुनील कर्जतकर, माजी आमदार गोपाळ अग्रवाल यावेळी उपस्थित होते.

आमदार बावनकुळे यांनी सांगितले की, महाविकास आघाडी सरकारने जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या वाढवून घेतली. या स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्यसंख्या जनगणनेच्या आधारानुसारच वाढवली जाते. २०११ च्या जनगणनेनुसार एकदा सदस्यसंख्या वाढवल्यानंतर २०२१ च्या जनगणनेनुसारच ही संख्या वाढविली जाऊ शकते. या निर्णयाला राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले.

आमदार बावनकुळे पुढे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत १० मार्च २०२२ पूर्वीची प्रभाग रचना कायम ठेवण्याचे आदेश दिले होते. महाविकास आघाडी सरकारने तेव्हा महाविकास आघाडी सरकारने ही पद्धतही बदलली. स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्यसंख्या व प्रभाग रचने संदर्भातील महाविकास आघाडी सरकारने घेतलेले निर्णय तत्काळ रद्द करावेत, अशी मागणी आपण निवेदनात केल्याचेही आमदार बावनकुळे यांनी नमूद केले.

# राष्ट्रवादीच्या सुषमा अंधारेंच्या शिवसेना प्रवेशाला आक्षेप

## रायगड युवासेना अधिकारी विपुल उभारे यांचे थेट पक्षप्रमुखांना पत्र





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर मागील काही दिवसांपासून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला गळती लागली आहे, मात्र उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि शाहू-फुले-आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्या सुषमा अंधारे यांनी जाहीर प्रवेश करीत शिवबंधन बांधले. त्यांच्या प्रवेशानंतर माणगाव येथील रायगड युवा सेना अधिकारी विपुल उभारे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना पत्र लिहून सुषमा अंधारे यांना शिवसेनेत प्रवेश नाकारावा, अशी मागणी केली आहे.

सुषमा अंधारे यांची वक्तव्ये ठाकरे कुटुंबियांविषयी आक्षेपार्ह राहिली असून हिंदुत्वाविषयी द्वेष निर्माण करण्याचे काम त्यांच्याकडून झाले आहे. त्यांनी कायम प्रक्षोभक भाषणे देण्याचे काम केले असून त्यांची भाषणशैली, आक्रस्तपणा हा महाराष्ट्रातील शिवसैनिकांना मान्य न होण्यासारखा आहे. सुषमा अंधारेंना शिवसेनेत प्रवेश दिल्यास शिवसेनेच्या प्रतिमेचे अवमूल्यन होईल तमाम शिवसैनिकांच्या भावनांचा विचार करावा आणि अंधारे यांना शिवसेनेत प्रवेश नाकारावा, अशी मागणी विपुल उभारे यांनी केली आहे.

# उंच इमारतींमध्ये फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट अनिवार्य

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईसह राज्यातील उंच इमारतींमधील अग्निसुरक्षेच्या दृष्टीने नव्या सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता ७० मीटर आणि त्यापेक्षा उंच इमारतींमध्ये फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे २०१८ पासूनच्या उंच इमारतींसाठी फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट अनिवार्य करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य बनले आहे.

शिंदे सरकारने महाराष्ट्रात विकासाची गंगा आणण्याची घोषणा केली असतानाच मुख्यमंत्र्यांनी राज्यासहीत नवी मुंबई या सुनियोजित शहरातही

**नव्या सरकारच्या निर्णयाने महाराष्ट्र ठरले देशात पहिले राज्य**

आता अग्निसुरक्षेच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलले आहे. त्याद्वारे, ऊर्जा विभागाने महानगरपालिका आणि अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जारी केलेल्या सर्वात महत्त्वाच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्रातील ७० मीटर आणि त्याहून अधिक उंचीच्या इमारतींमध्ये फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट बसवणे बंधनकारक केले आहे.

> **राज्य सरकारच्या ऊर्जा विभागाच्या माध्यमातून ७० मीटर उंचीपेक्षा अधिक उंच इमारतींमध्ये फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट बसविण्याबाबत नुकतेच एक परिपत्रक जारी करण्यात आले आहे. या लिफ्टद्वारे नागरिकांचा जीव वाचविण्यासाठी आणि मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी निश्चितच उपयोग होणार आहे. यासंदर्भात अग्निसुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तरतूद होती. आता त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू होईल. कोणत्याही उंच इमारतींमध्ये अग्निसुरक्षा टॉवर किंवा फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट असणे गरजेचे आहे.**
>
> **-विजय राणे, मुख्य अग्निशमन अधिकारी सिडको**

# नवी मुंबईत १२२पैकी २५ प्रभाग ओबीसींसाठी आरक्षित

## पत्ता कट झालेल्यांना शोधावा लागणार नवीन प्रभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या उपस्थितीत ओबीसी, ओबीसी महिला व सर्वसाधारण (महिला) आरक्षण सोडत प्रक्रिया कडक पोलीस बंदोबस्तात पार पडली. नवी मुंबई महानगरपालिकेत पॅनलमध्ये अनेकांना फटका बसला असला तरी एका पॅनलमध्ये तीन प्रभाग असल्याने त्यापैकी तिसरा क प्रभाग हा सर्वसाधारण महिला व पुरुषांसाठी ठेवण्यात आल्याने ती एक प्रकारची प्रस्तापितांना दिलासा देणारी आहे.



नव्या प्रभाग रचनेत वॉर्ड फुटल्याने अनेक ठिकाणी ओबीसी समाज विखूरला गेला होता. त्यामुळे अनेक ठिकाणी ओबीसी आरक्षण तर आधी जेथे आरक्षण होते, तो वॉर्ड सर्वसाधारण झाल्याचे पाहण्यास मिळाले. यात काही जणांचे प्रभाग आरक्षित झाल्याने आता कोणत्या प्रभागातून निवडणूक लढवता येईल किंवा आपल्या प्रभागात कोणता उमेदवार उभा करता येईल याबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत.

सर्वसाधारण महिला आरक्षण- एकूण ४१ प्रभाग हे खुले प्रभाग असतील. त्यापैकी एकही महिला नसलेल्या पॅनल मधील थेट २१ प्रभागांमध्ये थेट आरक्षण देण्यात आले. यात प्रभाग क्रमांक १७(अ), प्रभाग क्रमांक १३(अ), प्रभाग क्रमांक २६(अ), प्रभाग क्रमांक ३६(अ), प्रभाग क्रमांक ३(ब), प्रभाग क्रमांक ७(बी), प्रभाग क्रमांक ८(बी), प्रभाग क्रमांक ९(बी), प्रभाग क्रमांक १२(बी), प्रभाग क्रमांक १८(बी), प्रभाग क्रमांक १९(बी), प्रभाग क्रमांक २२(बी), प्रभाग क्रमांक २३(बी), प्रभाग क्रमांक २८(बी), प्रभाग क्रमांक २९(बी), प्रभाग क्रमांक ३१(बी), प्रभाग क्रमांक ३२(बी), प्रभाग क्रमांक ३४(बी), प्रभाग क्रमांक ३७(बी), प्रभाग क्रमांक ३९(बी), आणि प्रभाग क्रमांक ३५ (ब) प्रभागाचा समावेश आहे. २० ठिकाणी सर्वसाधारण महिला आरक्षणाची सोडत काढण्यात आली. सर्वसाधारण महिला प्रभाग याप्रमाणे-१(ब), २(ब), ६(ब), १३(ब), १६(ब), १७(बी), २०(बी), २१(बी), २४(बी), २६(ब), २७(बी), ३६(बी), ३८(बी), २५(ब), ४(ब), ५(ब), १०(ब), १५(ब), ३३(ब), ४०(ब) असे आरक्षित झाले. तसेच ओबीसी महिला प्रभाग- १अ, १४अ, १५अ, १६अ, २०अ, २१अ, २५अ, २७अ, ३०अ, ३३अ, ३८अ, ४०अ, ४१अ हे झाले आहेत. ओबीसी सर्वसाधारण प्रभाग-३अ, ७अ, ८अ, ९अ, १८अ, १९अ, २२अ, २८अ, २९अ, ३५अ, ३७अ, ३९अ असे आरक्षण जाहीर झाले.

# न्या. उदय लळीत ठरणार चौथे मराठी सरन्यायाधीश

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे ४९ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती उदय उमेश लळीत हे २६ ऑगस्ट २०२२ रोजी पदभार स्वीकारणार आहेत. देशाच्या न्यायव्यवस्थेतील सरन्यायाधीश हे पद भूषविणारे न्या. लळीत हे चौथे मराठी न्यायाधीश ठरणार आहेत. याआधी न्या. प्रल्हाद भालचंद्र गजेंद्रगडकर, न्या. यशवंत विष्णू चंद्रचूड, व न्या. शरद अरविंद बोबडे यांना हा बहुमान मिळाला होता. याखेरीज न्या. मनहरलाल हरिलाल कणिया, न्या. सॅम फिरोज भरुचा व न्या. सरोश कापडिया हे मराठी नसलेले परंतु महाराष्ट्रातील न्यायाधीश सरन्यायाधीश झाले होते.



### सिंधुदुर्ग ते राजधानी दिल्ली भरारी

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या देवगड तालुक्यातील गिर्ये-कोपरवाडी हे न्या. लळीत यांचे मूळ गाव. तेथील नृसिंह लक्ष्मी हे त्यांचे कुलदैवत. लळीत कुटुंबाचे या गावात गेले २०० वर्षे वास्तव्य आहे. न्या. लळीत यांच्या कुटुंबात वकिली तीन पिढ्या चालत आलेली आहे. व्यवसायानिमित्त कुटुंबाच्या या शाखेने कित्येक वर्षांपूर्वी गाव सोडले. न्या. लळीत यांनी मुंबईत जेमतेम दोन वर्षे वकिली केली. सन १९८५पासून ते दिल्लीत वकिली करू लागले. सुमारे सहा वर्षे त्यांनी ज्येष्ठ वकील सोली सोराबजी यांचे 'ज्युनियर' म्हणून काम केले. सन २००४मध्ये सर्वोच्च न्यायालयाने त्यांना ज्येष्ठ वकील म्हणून नामनिर्देशित केले.

विद्यमान सरन्यायाधीश न्या. एन. व्ही. रमणा यांच्या निवृत्तीनंतर न्या. लळीत त्यांच्या जागी येतील. १३ ऑगस्ट २०१४ रोजी न्या. लळीत यांची थेट सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली होती. अशा प्रकारे थेट सर्वोच्च न्यायालयात नेमणूक होऊन पुढे सरन्यायाधीश होणारे न्या. लळीत हे न्या. सिक्री व न्या. अजित नाथ रे यांच्या नंतरचे तिसरे न्यायाधीश असतील.

न्या. लळित यांची सरन्यायाधीश पदाची कारकिर्द अत्यल्प कालावधीची म्हणजे जेमतेम अडीच महिन्यांची असेल. यंदा ८ नोव्हेंबर रोजी वयाला ६५ वर्षे पूर्ण होतील तेव्हा न्या. लळीत निवृत्त होतील.

सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज सध्या स. १०.३० ते सायंकाळी ४.३० असे चालते. त्याऐवजी न्यायालयाची वेळ स. ९.०० ते दु. २ अशी करावी, असे मत न्या. लळीत यांनी दोनच आठवड्यांपूर्वी बोलून दाखविले होते. दरम्यान, असे केल्याने न्यायाधीशांनी प्रकरणांचा अभ्यास करण्यास संध्याकाळचा अधिक वेळ मिळेल, असे त्यांना वाटते.

न्या. लळीत नोव्हेंबरमध्ये निवृत्त झाल्यावर न्या. डॉ. धनंजय चंद्रचूड हे लागोपाठ दुसरे मराठी न्यायाधीश त्या पदावर येतील. न्या. चंद्रचूड यांना मात्र सुमारे दोन वर्षे एवढी सरन्यायाधीशपदाची कारकिर्द मिळेल.

वडिलांनंतर मुलगाही सरन्यायाधीश होण्याची ती दुसरी घटना ठरेल. त्याआधी न्या. हरिलाल जयकिशनदास व न्या. मनहरलाल हरिलाल हे कणिया पिता-पुत्र देशात संविधान लागू झाल्यानंतरचे बारताचे अनुक्रमे पहिले व २३ वे सरन्यायाधीश झाले होते.

# महाराष्ट्राला आता खऱ्या अर्थाने न्याय मिळाला

## अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला आता खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असल्याचे अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी म्हटले आहे. दरम्यान राज्यातील जनतेच्या हिताचे सरकार हे संजय राऊत यांच्यामुळेच आले असल्याची खोचक टीकाही खासदार राणा यांनी केली आहे. तसेच संजय राऊतांमुळेच उद्धव ठाकरे घरी बसले असून त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.



गेल्या काही दिवसांपासून राज्यात राणा दाम्पत्य आणि शिवसेना यांच्या संघर्ष आहे. काही दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे यांनी हनुमान चालीसा पठण करावे अशी मागणी दोघांनी केली होती. तसेच मुंबईत जाऊन उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी जाऊन हनुमान चालिसा पठण करण्याची घोषणाही त्यांनी केली होती. मात्र, राणा दाम्पत्य मुंबईत पोहोचताच त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. विविध प्रकारचे आरोप त्यांच्यावर विरोधकांकडून झाले. दरम्यान, खासदार राणा पुढे म्हणाल्या, संजय राऊतांमुळेच जनतेच्या हिताचे राज्य आले आहे. आपण सर्वांनीच प्रथम खासदार राऊत यांचे अभिनंदन केले पाहिजे. मी सुद्धा त्यांचे अभिनंदन करते, अशी टीकाही त्यांनी संजय राऊतांवर केली. उद्धव ठाकरेंना घरी बसवण्याचे काम संजय राऊतांनी केले असेही त्या म्हणाल्या.


पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. ३० जुलै २०२२ रोजी होणारे
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ ९. आंबेडकर भवन, पनवेल ■ १०. सीकेटी हायस्कूल, न्यू पनवेल
- ११. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

**ग्रामीण लसीकरण**

■ धरणा ■ चाळ/नागझरी ■ ढोंगऱ्याचा पाडा ■ बिड/खुटारी/एकटपाडा ■ सिध्दी करवले ■ भिंगारी

ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.


# डोंबिवलीतील स्वामी विवेकानंद विद्यामंदिरच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम

**डोंबिवली : प्रतिनिधी**

डोंबिवलीतील राष्ट्रीय शिक्षण संस्था संचालित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर प्राथमिक विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे सदस्य व माजी कार्यवाह संजय कुलकर्णी यांनी दिली.

राणाप्रताप भवनच्या डॉ. हेडगेवार सभागृहात रविवारी आयोजित करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, सेवानिवृत्त शिक्षक-शिक्षिका यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. शाळा समितीचे अध्यक्ष नरेंद्र दांडेकर, मुख्याध्यापिका सुनंदा बेडसे यावेळी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

आपली आई आणि प्राथमिक शाळा, शाळेतील बाई या विद्यार्थ्यांना घडवित असतात, त्यांच्यावर संस्कार करतात. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या मनोगतातून शाळा आणि आपल्या शिक्षकांप्रती असलेला आदर, जिव्हाळा, आपलेपणा दिसून आला, असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

२०२२-२३ या सुवर्ण महोत्सवीवर्षांत आयोजित कार्यक्रमात सर्व माजी विद्यार्थी, सेवानिवृत्त शिक्षक यांनी मोठ्या संख्येत सहभागी व्हावे, असे आवाहनही कुलकर्णी यांनी केले.

मुख्याध्यापिका बेडसे बाई, शाळा समितीचे अध्यक्ष नरेंद्र दांडेकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका दिपाली काळे यांनीही मनोगत व्यक्त केले. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांच्या नियोजनाविषयी शिक्षिका पाटील यांनी माहिती दिली. शिक्षक दत्ता मोंडे यांनी सूत्रसंचालन केले तर शिक्षिका भूमिका महाजन यांनी उपस्थितांचे आभार मानले. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नरेंद्र दांडेकर यांच्याशी ९१९३२१९९७६६१/ ९१९८३३१०८२५८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे कळविले आहे.

# उरणमध्ये 'प्रधानमंत्री पीक विमा' प्रसार रथ

**उरण : बातमीदार**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी उपसंचालक कृषी जिल्हा रायगड दत्तात्रय काळभोर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले व हिरवा झेंडा दाखवून प्रचार प्रसिद्धीच्या रथास २५ जुलैपासून सुरुवात करण्यात आली.



उरण तालुक्यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा शेतकऱ्यांपर्यंत प्रचार आणि प्रसिद्धी व्हावी यासाठी मंगळवारी (दि. २६)तालुक्यामध्ये प्रचार आणि प्रसार करण्यात आला. या वेळी तालुका कृषी अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी पर्यवेक्षक आणि कृषी सहाय्यक यांच्यासह तालुका पीक विमा प्रतिनिधी उपस्थित होते. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी कृषी विभागामार्फत प्रधानमंत्री पिकविमा योजना खरीप हंगाम २०२२-२३करिता उरण तालुक्यामध्ये भात या पिकासाठी राबवत आहे. या योजनेत सहभागी होण्याची मुदत ३१ जुलै असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सांस्कृतिक कट्टा

वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल

**सुधीर फडके स्वर रजनी**
(३० जुलै, रात्रौ. ८.३० वा.)

**अ परफेक्ट मर्डर**
(३१ जुलै, दु. ४.३० वा.)

# मच्छीमार नौका पुन्हा झेपावणार समुद्रात

## मासेमारीसाठी बंदरात सज्ज होतायेत बोटी; जोरदार तयारी

**उरण : प्रतिनिधी**

शासनाच्या खोल समुद्रातील ६० दिवसांच्या पावसाळी मासेमारी बंदीच्या आदेशानंतर १ ऑगस्टपासून मासेमारीला सुरुवात होणार आहे. आता अवघ्या दोन दिवसांचाच अवधी उरल्याने मासेमारीच्या पूर्वतयारीसाठी करंजा-मोरा-कसारा, ससून डॉक बंदरात मच्छिमारांची लगबग सुरू झाली आहे.

खोल समुद्रातील मासेमारी ५० ते ६० वाव खोलीपर्यंत केली जाते. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासूनच खवळलेला समुद्र शांत होतो. शांत झालेल्या सागरात पर्सियन नेट फिशिंगसाठी विशेषतः नारळी पोर्णिमेनंतर पोषक वातावरण असते. यंत्राच्या साहाय्याने जाळी मच्छीमार बोटीत खेचली जातात. यामध्ये घोळ, काटबांगडे, मुशी, तकला, सुरमई, शिंगाला, तुणा, हलवा, तांब, पाकट यांसारखी समुद्राच्या भूपृष्ठावरील तरंगती मासळी पकडली जाते. पर्सियन फिशिंगसाठी शासनाकडून सप्टेंबर महिन्यापासूनच सुरुवात करण्यास परवानगी असली तरी तरी या प्रकारातील मासेमारी ऑगस्ट महिन्यापासूनच केली जाते.



**मच्छीमार संस्थांकडून रांगा लावून डिझेल खरेदीऐवजी खुल्या बाजारातून डिझेल खरेदी करून १ ऑगस्ट २०२२ रोजीच मासेमारीचा श्रीगणेशा करण्याच्या तयारीत हजारो मच्छीमार गुंतले असल्याची माहिती व्यावसायिक रवींद्र कोळी यांनी दिली आहे.**

खोल समुद्रातील मासेमारीसाठीही मोरा-करंजा, कसारा, ससून डॉक बंदरात शेकडो मच्छिमारी ट्रॉलर्स सज्ज होऊ लागले आहेत. खोल समुद्रातील मासेमारीसाठी मच्छिमारांना ५० ते ७० वाव खोल समुद्रात जावे लागते. त्यासाठी एका ट्रिपसाठी १० ते १२ दिवस खर्ची घालावे लागतात. खोल समुद्रातील एका ट्रिपसाठी सव्वा ते दीड लाखांपर्यंत खर्च येतो. समुद्राच्या तळाशी असलेली सर्वच प्रकारची मासळी या पद्धतीत पकडली जाते. जाळी व बोटींची डागडुजी, रंगरंगोटी आणि इतर तत्सम कामांची विविध बंदरात मच्छिमारांची आतापासूनच लगबग सुरू झाली आहे.





**खारघर : नव्याने सुरू झालेल्या प्युरिटी फार्म्स केक शॉप आणि कॅफेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. यासाठी त्यांनी अक्षय करपे आणि पूजा पोसम यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी महापालिकेच्या माजी नगरसेविका नेत्रा पाटील, भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, युवा मोर्चाचे दिनेश खानावकर, समीर कदम, जयेश ओसम, आराफी रोगे उपस्थित होते.**



**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप सरकारने आठ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल सेवा सुशासन व गरीब कल्याणपर्व राबवण्यात येत आहे. त्या अंतर्गत कोरोना महामारीच्या काळात पनवेलमधील ज्या डॉक्टरांनी आपले भरीव योगदान दिले, त्याबद्दल भाजपच्या वतीने डॉ. गिरीश गुणे यांचा सत्कार करण्यात आला असून त्यांच्या पत्नी संजीवनी गुणे यांनी हा सत्कार स्वीकारला. या वेळी माजी नगरसेविका निता माळी, भाजप खजिनदार संजय जैन, ज्योती देशमाने, निना मंजुळे आदी उपस्थित होते.**

## शिंदे समर्थक रुपेश पाटील यांच्या कार्यालयावर हल्ला





**उरण : रामप्रहर वृत्त**

आदित्य ठाकरे यांच्या युवा सेनेला झटका दिल्याचा राग मनात धरून अज्ञातांनी एकनाथ शिंदे यांचे समर्थक रुपेश पाटील यांच्या उरण येथील कार्यालयावर भ्याड हल्ला करीत त्यांच्या गाडीची तोडफोड केली.



एकनाथ शिंदे यांनी उठाव केला व ते राज्याच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले. यानंतर महाराष्ट्रातील विविध ठिकाणी शिवसेनेचे खासदार, आमदार, नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनीदेखील शिंदे गटामध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. युवा सेना माजी रायगड जिल्हा सचिव, राष्ट्रीय सहसचिव तथा विस्तारक रुपेश पाटील यांनीही राज्य कार्यकारिणी, पदाधिकाऱ्यांसमवेत शिंदे गटाला पाठिंबा देऊन आदित्य ठाकरे यांच्या युवा सेनेला झटका दिला. याचाच राग मनात धरून अज्ञातांनी रुपेश पाटील यांच्या गाडीची तोडफोड केली व उरण येथील कार्यालयावर भ्याड हल्ला केला. याबाबत रुपेश पाटील यांनी गुन्हा दाखल केला असून त्यांना पोलीस संरक्षणदेखील पुरविण्यात आले आहे.

## सीकेटी महाविद्यालयात महाआरोग्य शिबिराला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर महाविद्यालयात (सीकेटी) मेडिकव्हर हॉस्पिटल, भारतीय विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्याने महाआरोग्य शिबिर झाले. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते झाले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल, भारतीय विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि राष्ट्रीय सेव योजनेच्या सहकार्याने महाआरोग्य शिबिर झाले. शिबिरात चष्मे वाटप, नेत्रतपासणी, तसेच विविध तपासण्या करण्यात आल्या. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, आयक्युएसी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. एस. बी. यादव, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी एस. एन. परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी अपूर्वा ढगे, कार्यक्रम अधिकारी आकाश पाटील यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.





## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मून डे उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरूवारी (दि. २८) भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने 'मून डे' उत्साहात साजरा करण्यात आले. मानवाचे चंद्रावरील पहिले पाऊल याबाबत मुलांमध्ये विशेष आवड निर्माण करण्यासाठी पोस्टर मेकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाच्या रूपरेषेमध्ये पावर पॉइंटच्या माध्यमातून तसेच चंद्राच्या छोट्या प्रतिरूपापासून चंद्राच्या विशेष घटकाबद्दल माहिती देण्यात आली. चंद्रावरील वेगवेगळे शोध तसेच चंद्राचा पृथ्वीवरील प्रभाव (भरती, आहोटी) याबद्दल भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. स्मिता राऊत आणि भौतिकशास्त्र विभागातून प्रा. रोहित पाटील यांनी सादरीकरण केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. पोस्टर मेकिंगसाठी परिक्षक म्हणून प्रा. रीत थुळे, प्रा. नम्रता गजरा, प्रा. मीनल माडवे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राध्यापकांचे कौतुक केले, तसेच आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.





## वीर वाजेकर महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात एनसीसी विभागाच्या वतीने कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. या वेळी कारगिल युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी दीपप्रज्वलीत करून शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी ते म्हणाले की, भारतभूमीच्या रक्षणार्थ सैन्य सीमेवर तैनात आहे, त्यामुळेच सामान्य माणूस सुखात आहे. आजच्या युवकांनी आपल्या भारतभूमीच्या रक्षणार्थ सैन्य दलाच्या सेवेचा विचार करावा. या प्रसंगी सर्व राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी वीर जवानांना सलामी दिली. नितीन जैस्वाल या एनसीसीच्या विद्यार्थ्याने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन प्रा. संतोष देसाई यांनी केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास महाले, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी बहुसंख्येने या वेळी उपस्थित होते.

## कामोठे येथे जी. जी. गोल्ड ज्वेलर्स दुकानाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे वसाहतीमध्ये वाढत्या नागरीकरणासोबत नवनवीन उद्योगांना चालना मिळत आहे. त्या अंतर्गत कामोठे सेक्टर १४ येथे नव्याने जी. जी. गोल्ड हा ज्वेलर्सचा व्यवसाय विनायक गायकवाड आणि सतिश गिड्डे यांनी सुरू केला आहे. या दुकानाचे उद्घाटन पनवेल महापलिकेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती कुसूम म्हात्रे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २९) झाले. या दुकानाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.



कामोठे येथे नव्याने सुरु झालेल्या जी. जी. गोल्ड ज्वेलर्सच्या दुकानाच्या उद्घाटनावेळी पनवेल मनपाच्या माजी महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानवर, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, दिलीप पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, भाजपचे कामोठे शहराध्यक्ष रवि जोशी, भटके विमुक्त आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्षा विद्या तामखेडे, भाजप व्यापारी आघाडीचे नानासाहेब मगदूम, विनायक गायकवाड, प्रियंका गायकवाड, सतीश गिड्डे, पुनम गिड्डे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्रावणात भाजीपाल्याचे दर वाढले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रावण महिना म्हटला की, ताटात भाज्यांची मेजवानी असते. त्यामुळे खवय्यांच्या जिभेचे चोचले पुरवण्यासाठी बाजारात हिरव्यागार भाज्यांची आवकही वाढली आहे, पण मुसळधार पावसाचा फटका व मागणी वाढल्याने भाज्यांचे दर कडाडण्याची शक्यता असून श्रवणालाही महागाईची फोडणी लागणार आहे.



श्रावण महिन्यात बहुतेक जण मांसाहार वर्ज्य करीत असल्याने एक महिना भाज्यांवर समाधान मानावे लागते. त्यात सोमवार, गुरुवार व शनिवार या दिवसांमध्ये अनेक जण उपवास करतात. यंदा गुरुवारी दीप अमावस्या आल्याने बहुतेकांनी बुधवारीच गटारी साजरी केली. त्यामुळे शुक्रवारपासून श्रावण मास सुरू झाला असला, तरी गुरुवारपासूनच शाकाहारी जेवणाला सुरुवात झाली आहे. मागणी वाढल्याने भाजी मार्केटमध्ये भाज्यांची आवकही वाढली आहे, मात्र किरकोळ बाजारात भाज्या चढ्या भावानेच विकल्या जात असल्याचे बाजारपेठेत पहावयास मिळाले.

**“ कोरोना महामारीनंतर बाजारपेठ खुली झाली आहे. ऐन श्रावणात भाजीपाल्याच्या भावाने उच्चांक गाठला तर पुन्हा आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. त्यात होलसेल मंडईत दलालांच्या अरेरावीमुळे भाजी विक्रेता संकटात आहे.**

**-अशोक शिंदे, भाजी विक्रेता**

**“ श्रावण मास सुरू झाल्यामुळे भाज्यांचे भाव वाढले आहेत. सर्वसामान्यांना मीठ-भाकरी खाऊन श्रावणी सोमवार आणि शनिवारचे उपवास सोडावे लागतायेत की काय अशी शंका आहे.**

**-रेश्मा रुपनर, गृहिणी**

## उरण नगर परिषदेचे आरक्षण जाहीर; २१पैकी ११ जागा महिलांसाठी राखीव

**उरण : प्रतिनिधी**

उरण नगर परिषदेचे १० प्रभागातील आरक्षण जाहीर झाले आहे. नव्याने झालेल्या प्रभाग रचनेच्या ते उमेदवारांची संख्या १७वरून २१वर पोहचली आहे. १० प्रभागात महिलांसाठी ११ जागा आरक्षित ठेवण्यात आल्या असल्याची माहिती उरण मुख्याधिकारी संतोष माळी यांनी दिली आहे.

उरण नगर परिषद कार्यालय सभागृहात गुरुवारी (दि. २८) पनवेल उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्या नियंत्रणाखाली उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी उपस्थित होते. लोकसंख्येनुसार चार जागा वाढलेल्या उरण नगर परिषदेत एकूण २१ नगरसेवक असणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांची निवडणुकीची मोर्चेबांधणी आखली जात असल्याचे चित्र उरण शहरात दिसत आहे.

### जाहीर झालेले प्रभागनिहाय आरक्षण

**प्रभाग क्रमांक १ अ सर्वसाधारण (महिला), ब सर्वसाधारण, २ अ अनुसूचित जाती (महिला), ब सर्वसाधारण, ३ अ नामाप्र, ब सर्वसाधारण (महिला), ४ अ नामाप्र, ब सर्वसाधारण (महिला), ५ अ नामाप्र (महिला), ब सर्वसाधारण, ६ अ अनुसूचित जाती, ब सर्वसाधारण (महिला), ७ अ नामाप्र (महिला), ब सर्वसाधारण, ८ अ सर्वसाधारण (महिला), ब सर्वसाधारण, ९ अ नामाप्र (महिला), ब सर्वसाधारण, १० अ सर्वसाधारण (महिला), ब सर्वसाधारण (महिला), क सर्वसाधारण.**

## कळंबोलीत मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीत सर्कल येथे साईभक्त राहुल पाटील यांच्या पुढाकाराने गरजू व वाहतूकदारांसाठी डायबेटीस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मोफत आरोग्य तापासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शेकडो नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

कळंबोली परिसरातील वाहतूकदारांना लवकर आरोग्य सुविधा उपलब्ध होत नाही. या हेतूने नेहमी सामाजिक उपक्रमात पुढाकार घेणारे साईभक्त राहुल पाटील यांनी पुढाकार घेत कळंबोली सर्कल येथे डायबेटीस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये मधुमेह होण्याची धोक्याची गुणसंख्या, मधुमेह तपासणी, उच्च रक्तदाब तपासणी, उंची, वजन, बीएमआय, मधुमेह तांड्यांपासून तपासणी व मार्गदर्शन, फुफ्फुसाची क्षमता तपासणी आदी तपासण्या करण्यात आल्या.



## संपादकीय

# विस्ताराची काळजी कोणाला?

भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना युतीचे नवे सरकार सत्तेवर आल्यास २९ दिवस उलटले तरी मंत्रिमंडळ विस्तार होत नाही याची सर्वाधिक काळजी महाविकास आघाडीच्या नेत्यांना लागली आहे असे दिसते. परंतु हाताच्या बोटावर मोजण्याइतके मंत्री कारभार करत असल्याची उदाहरणे अन्य राज्यांमध्येही कमी नाहीत. मुद्दा मंत्रिमंडळाच्या आकाराचा नसतो तर सत्ताधाऱ्यांच्या कार्यक्षमतेचा असतो.

**शिवसेनेत उठाव करणाऱ्या एकनाथ शिंदे यांनी २९ दिवसांपूर्वी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि त्यांच्या सोबत भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारले. राजभवनात झालेल्या साध्याशा शपथविधी सोहळ्यात या दोघांनीच शपथ घेतली आणि लवकरच उर्वरित मंत्रिमंडळ अस्तित्वात येईल याची ग्वाही दिली होती. तथापि, अनेक ज्ञात-अज्ञात कारणांमुळे मंत्रिमंडळाचा विस्तार अद्याप होऊ शकलेला नाही. तो येत्या काही दिवसांतच होईल असे भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश महाजन यांनी नुकतेच स्पष्ट केले आहे. दोघांचेच सरकार कारभार करत आहे हे महाविकास आघाडीच्या नेत्यांना बहुदा सहन होत नाही. विस्तार कधी होणार याची काळजी त्यांनाच लागून राहिलेली आहे. जनमताचा आदर करणारे सरकार पुन्हा एकदा सत्तेवर आल्यामुळे जनता मात्र निश्चिंत आहे. शिंदे-फडणवीस जोडीच्या कारभारावर आज महाविकास आघाडीचे जे नेते टीका करत आहेत, त्यांनी थोडेसे मागे वळून पाहायला हवे. अडीच वर्षांपूर्वी जनादेश गुंडाळून ठेवून त्यांचे सरकार सत्तेवर आले होते. प्रचंड मोठ्या बहुमताच्या गमजा मारल्या जात होत्या. तेव्हा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह फक्त सहा जणांनीच प्रारंभी मंत्रिपदाच्या शपथा घेतल्या होत्या. सहा मंत्र्यांचे हे सरकार तब्बल ३३ दिवस कारभार करत होते. त्यानंतरच मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त सापडला होता. बिहारमध्ये देखील असे काही काळ घडले आहे. शिंदे-फडणवीस या दोघांचेच सरकार तूर्त अत्यंत समर्थपणे राज्याचे गाडे रूळावर आणण्यासाठी कार्यरत आहे. कारभाराची सूत्रे हाती घेतल्यावर सुरूवातीचा काही काळ गेल्या सरकारचे काही निर्णय दुरुस्त करण्यामध्येच घालवावा लागला आहे. आरे कारशेडचा विषय असो, शेतकऱ्यांच्या अनुदानाचा प्रश्न असो, किंवा अवैधरित्या घेतलेल्या निर्णयांचा फेरविचार असो ही कामे शिंदे-फडणवीस सरकारला प्राधान्यक्रमाने हाती घ्यावी लागली. अस्ताव्यस्त झालेले घर पुन्हा झाडूनपुसून लख्ख करण्यास काही कालावधी लागतोच. मुख्यमंत्री शिंदे विस्ताराच्या चर्चेसाठी वारंवार दिल्लीला जातात का असा सवाल विरोधकांकडून केला जात आहे. वास्तविक या सवालरूपी आरोपामध्ये काडीचे तथ्य नाही. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचा विस्तार काही काळ लांबला ही वस्तुस्थिती आहेच. परंतु तो का लांबला असावा हे समजून घेतले पाहिजे. या विलंबाची बीजे ज्या परिस्थितीत हे सरकार अस्तित्वात आले त्यामध्ये आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाशी साटेलोटे करून अस्तित्वात आलेल्या महाविकास आघाडीला मोठमोठाली खिंडारे पाडून शिवसेनेतील ४० आमदार आणि १२ खासदारांनी उठाव करण्याचे धाडस केले. त्यामुळे उद्भवलेली राजकीय परिस्थिती स्थिरस्थावर होईपर्यंत मंत्रिमंडळाचा विस्तार टाळणे ईष्टच मानावे लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मंत्रिमंडळ विस्तार न झाल्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेचे काहीच बिघडलेले नाही. जे निर्णय तातडीने व्हायला हवेत, ते घेतले जात आहेत. त्यामुळे विरोधकांनी कितीही आरडाओरडा केला तरी दोन समर्थ नेत्यांचे नवे सरकार उत्कृष्ट कारभार करेल यात शंका नाही.**

# सुधागड तालुक्यातील आरोग्यसेवा सलाईनवर

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात गोरगरीब सर्वसामान्य रुग्ण, नागरिक व गर्भवती महिलांना आधार असलेल्या आरोग्य केंद्राला घरघर लागली आहे. या ठिकाणची आरोग्य सेवा सलाईनवर असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होताहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत, साथीचे आजार उद्भवत आहेत.

गोरगरीब जनतेची मदार ज्या आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांच्यावर आहे, तेथे आज महत्त्वाची पदे रिक्त आहेत. त्यामुळे येथे नागरिकांना कोणत्या दर्जाची आरोग्य सुविधा मिळत असेल याची कल्पना न केलेली बरी.

सुधागड तालुक्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा सलाईनवर आहे. तालुक्यातील दोन प्राथमिक आरोग्य केंद्र आणि १४ आरोग्य उपकेंद्रातील आरोग्य सेविका, कम्युनिटी हेल्थ ऑफिसर व इतर पदे रिक्त आहेत. परिणामी गाव तसेच आदिवासी वाड्यापाड्यांवर आरोग्य सेवा पुरविण्यात अडचणी येत आहेत. शिवाय उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताणदेखील पडत आहे.

वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून ही रिक्तपदे भरली जात नाहीत. आरोग्य सेविकांच्या मंजूर १६ पदांपैकी तब्बल १० पदे रिक्त असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. सर्व प्रकारचे लसीकरण, पोलिओ डोस, कोरोना लस, विविध आजारांची नोंद व औषधोपचार, रोग प्रतिबंधक कामे, आरोग्य विषयक जनजागृती, आरोग्य शिक्षण, गरोदर स्त्रिया व विद्यार्थी यांची तपासणी, शासनाच्या विविध योजना तळागाळात पोहचविणे आदी कामे रखडतात व वेळेत होत नाहीत. कम्युनिटी हेल्थ ऑफिसरची १४ पैकी निम्मी पदे रिक्त असल्याने विविध आजारांच्या रुग्णांची माहिती घेणे, नोंदी ठेवणे, त्यांना उपचारासाठी पाठविणे, तसेच कार्यालयीन





विविध कामे खोळंबत आहेत. शिपाई नसल्याने साफसफाई व इतर कामे होत नाहीत.

सुधागड तालुक्यात आदिवासी लोकसंख्या जास्त आहे. खेड्यापाड्यात दुर्गम भागात राहणारे लोक हे शासनाने दिलेल्या आरोग्य सेवेवरच अंवलंबून असतात, मात्र रिक्तपदांमुळे तेथे त्यांना आरोग्य सेवा मिळत नाही. परिणामी त्यांना खासगी रुग्णालयाचा रस्ता पकडावा लागत आहे. कधी पैशांअभावी उपचारांवार पाणी सोडावे लागत आहे.

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

### अशी आहेत एकूण रिक्त पदे

कम्युनिटी हेल्थ ऑफिसर या मंजूर १४ पदांपैकी ७ पदे रिक्त आहेत. तालुका आरोग्य कार्यालय सुधागड पाली येथे कनिष्ठ सहाय्यक या मंजूर एक पदापैकी हे पद रिक्त आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र पाली अंतर्गत पदे रिक्त आहेत. यामध्ये आरोग्य सेवक महिला या मंजूर आठ पैकी तब्बल सात पदे रिक्त आहेत. यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र पाली मुख्यालय, उपकेंद्र नाडसूर, सिद्धेश्वर, आपटवणे, नांदगाव, नेणवली व उद्धार येथील पदे रिक्त आहेत. कनिष्ठ सहाय्यक मंजूर एक पदांपैकी हे पद रिक्त आहे. शिपाई मंजूर दोन पदांपैकी पाली प्राथमिक आरोग्य केंद्रातील एक पद रिक्त आहे. जांभूळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील पदे रिक्त आहेत. यामध्ये आरोग्य सेवक महिला या मंजूर आठ पदांपैकी तीन पदे रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र जांभूळपाडा मुख्यालय, उपकेंद्र हातोंड व नवघर येथील ही पदे रिक्त आहेत. शिपाई मंजूर दोन पदांपैकी जांभूळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील एक पद रिक्त आहे. प्राथमिक आरोग्य युनिट खवली येथे औषध निर्माण अधिकारी मंजूर एक पदापैकी हे पद रिक्त आहे. आरोग्य सेवक महिला मंजूर एक पदापैकी हे पद रिक्त आहे.

### ग्रामीण रुग्णालयाच्या प्रतीक्षेत जनता

पालीत ग्रामीण रुणालय मुख्य इमारत व कर्मचारी निवासस्थाने बांधकामासाठी २० कोटी २७ लक्ष रक्कम खर्च करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन मागील महिन्यात माजी पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. मात्र गती मिळाली नाही. ग्रामीण रुग्णालय झाल्यास तालुक्यातील जनतेला दर्जेदार आरोग्य सेवा मिळतील. मागील सहा ते सात वर्षांपासून ग्रामीण रुग्णालय प्रलंबित आहे. येथे अजूनही एक वीटदेखील रचण्यात आलेली नाही, असे ग्रामीण रुग्णालयासाठी आंदोलन करणारे हभप महेश पोंगडे महाराज यांनी सांगितले.

### सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर ताण

सुधागड तालुक्यात पाली व जांभूळपाडा ही दोन प्राथमिक आरोग्य केंद्रे असून या अंतर्गत १४ उपकेंद्र आहेत. पाली प्राथमिक आरोग्य केंद्रावर जवळपास ४३८१० लोक अवलंबून आहेत. तर जांभुळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्रावर २८८६१ इतके लोक अवलंबून आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत या आरोग्य केंद्रांवर प्रचंड ताण येतो. शिवाय रिक्तपदे, सोयीसुविधांचा अभाव आणि सर्व उपचार मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय होते. छोटे आजार, सर्पदंश, प्रसूती, अपघातग्रस्तांवर उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात किंवा खासगी रुग्णालयात लोकांना जावे लागते. त्यामुळे लोकांची गैरसोय होतेच. त्याबरोबर वेळ व पैसेदेखील अधिक लागतात. परिणामी येथे ग्रामीण रुग्णालय झाल्यास लोकांना या व इतर आरोग्य सेवा येथेच उपलब्ध होणार आहेत. शिवाय प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रावरील ताणदेखील कमी होईल, अशी लोकांची मागणी आहे.

याबाबत बोलताना पेडली येथील तरुण सामाजिक कार्यकर्ते दर्शन तळेकर म्हणाले की, आरोग्य सेविका उपलब्ध नसल्याने बऱ्याचदा आरोग्य उपकेंद्र बंद असतात. त्यामुळे लांबून येणाऱ्या रुग्णांना परत जावे लागते. त्यांना आरोग्य सेवेचा लाभ मिळत नाही. शिवाय वेळ व पैसादेखील वाया जातो. लसीकरण व इतर कामे देखील वेळेवर होत नाहीत. त्यामुळे सर्व रिक्तपदे लवकर भरण्यात यावीत. जांभूळपाडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नंदकुमार मुळे म्हणाले, ही रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीकोनातून जि. प. कडे नियमित रिक्तपदांच्या आकडेवारीचा अहवाल सादर केला जातो. येथील रिक्त पदे भरल्यास आरोग्य सेवेचे कामकाज अधिक गतीने होईल. तरी उपलब्ध कर्मचाऱ्यांवर नागरिकांना वेळवर व चांगली आरोग्य सेवा देण्याचा आमचा प्रयत्न असतो.

## बदलते तंत्रज्ञान




### गुगल मॅप होणार सचित्र

भारतातल्या दहा शहरांमध्ये सेवा देण्यास गुगल सज्ज आहे. अनोळखी प्रदेशात एखाद्या ठिकाणाचा शोध घ्यायचा असेल तर गुगुल मॅपचा सरहास वापर केला जातो. गुगलने आपल्या फिचरला वेळोवेळी अपडेट केले आहे. मात्र गुगलने आता गुगल स्ट्रीट व्ह्यू नावाचे नवे फीचर लाँच केले आहे. या फिचरच्या मदतीने वापरकर्त्यांना एखादे ठिकाणी ३६० अशांत पाहता येणार आहे. तांत्रिक भाषेत या सुविधेला ३६०-डिग्री इंटरॲक्टिव्ह पॅनोरमा फीचर म्हटले जात आहे. गुगलचे हे नवे फिचर सध्या देशातील दहा शहरात लाँच करण्यात आले आहे. या फीचरसाठी गुगलने स्थानिक कंपनी टेक महिंद्रा आणि मुंबई येथील जेनेसिस इंटरनॅशनल या कंपन्यांसोबत भागिदारी केली. मिळालेल्या माहितीनुसार गुगलने ३६०-डिग्री इंटरॲक्टिव्ह पॅनोरमा फीचर लाँच केले आहे. हे फीचर सध्या देशातील फक्त दहा शहरांमध्ये राबविले जात आहे. आगामी दोन वर्षांत सात लाख किमी, ५० शहरांचे मॅपिंग करुन या शहरांत हे फीचर लागू केले जाईल. केंद्र सरकारच्या बदललेल्या २०२१ धोरणामुळे गुगलला हे शक्य झाले आहे.

गुगल मॅपच्या उपाध्यक्षा मिरियम कार्तिका डॅनियल यांनी गुगलच्या या नव्या फिचरबद्दल अधिक माहिती दिली आहे. गुगलने ज्यांच्यासोबत भागिदारी केली आहे, अशा कंपन्यांकडे चांगला अनुभव आहे. तसेच त्यांच्याकडे मूलभूत भौगोलिक तंत्रज्ञान आहे. या संस्थांनी स्थानिक डेटा गोळा करणे गरजेचे आहे. सरकारी कार्यालये, संरक्षण आणि लष्करी क्षेत्राचे मॅपिंग केले जाणार नाही. कोणत्या भागाचे मॅपिंग करावे आणि कोणत्या नाही याबाबतची कल्पना आमच्या भागिदारांना आहे, असे डॅनियल यांनी सांगितले आहे. दरम्यान, गुगलने २०११ साली स्ट्रीट व्ह्यू मॅपिंग करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र दरम्यानच्या काळात यावर आक्षेप घेतला गेला होता. त्यानंतर थेपेल ॲन्ड लेटर मॅप माय इंडिया या संस्थांनी मॅपिंगवर काम करण्यास सुरुवात केली होती. मात्र याबाबतची अधिकृत माहिती लवकरच अपडेट होईल असे सांगण्यात येत आहे.

# संगीत क्षेत्रातील महनीय डॉ. अशोक रानडे

डॉ. अशोक दामोदर रानडे जन्म यांचा जन्म पुण येथे २५ नोव्हेंबर १९३७ मध्ये झाला. हे भारतीय शास्त्रीय संगीतविशारद, समीक्षक आणि लेखक होते. भारतीय कला आणि संस्कृतीचे अभ्यासक, भाष्यकार, प्रयोगशील संगीतकार, गायक, साहित्यिक आणि अध्यापक अशा विविध नात्यांनी त्यांनी ५०हून अधिक वर्षे संगीतासाठी काम केले. इंग्रजी व मराठीतील ग्रंथलेखन, नाटक-चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन, कित्येक थिमॅटिक कार्यक्रम देणारे डॉ. रानडे सतत अध्यापन, लेखन आणि संगीताच्या विश्वातील एकेका संकल्पनेचा वेध घेण्यात गुंतलेले असत. त्यांचे निधन ३० जुलै २०११मध्ये झाले.



डॉ. अशोक रानडे यांना मुळात साहित्यात रस होता. मात्र त्यांनी वडिलांच्या आग्रहापोटी बीएला अर्थशास्त्र घेतले. नंतर एलएलबी केले. साहित्याची ओढ असल्याने मराठी वाङ्मयात एमए केले. मग इंग्रजी साहित्य खोलात जाणून घ्यायचे म्हणून पुन्हा इंग्रजीत एमए केले डॉक्टरेटचा अभ्यास डॉ. रा.भा. पाटणकरांकडे चालू असताना दोन तीनदा विषय बदलले. ध्वनिसिद्धान्तावर संशोधन करीत असतानाच शेक्सपिअरच्या नाटकांमधील संगीत यावर डॉक्टरेट करावी, असाही त्यांना आग्रह झाला.

वयाच्या दहाव्या वर्षापासूनच संगीताचे शिक्षण चालू होते. पंडित गजाननराव जोशी, पंडित प्रल्हाद गानू, पंडित लक्ष्मणराव बोडस आदिंकडे डॉ. रानडे यांनी संगीत शिक्षण घेतले. प्रो. बी. आर. देवधर यांच्याकडे आवाजाच्या आणि कंठसंगीताच्या तंत्रज्ञानाचा सखोल असा अभ्यास केला.

शास्त्रीय संगीताच्या बाबतीत अगदी सुरुवातीपासून हा व्यवसाय म्हणून करायचा नाही असा त्यांचा दृष्टिकोन होता. शेवटपर्यंत या तत्वाबरोबर ते राहिले. मुंबईच्या आकाशवाणी

**निमित्त**

केंद्रात डॉ. रानडे यांनी १९६३ ते ६६ या काळात नोकरी केली. त्यानंतर १९६७ ते १९६८ या काळात 'सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकॉनॉमिक्स' मध्ये त्यांनी अर्थशास्त्र शिकविले. १९६८मध्ये ते मुंबई विद्यापीठात युनिव्हर्सिटी म्युझिक सेंटरचे संचालक झाले. तेथे ते १९८३पर्यंत होते. त्यानंतर पुण्याच्या अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन स्टडीज या संस्थेत एका वर्षासाठी ते सहसंचालक झाले. १९८४पासून ते १९९३पर्यंत डॉ. रानडे हे मुंबईच्या नॅशनल सेंटर फॉर दि परफॉर्मिंग आर्ट्समध्ये उपसंचालक म्हणून काम करीत होते.

स्वतः जयपूर आणि ग्वाल्हेर घराण्याची गायकी गळयात घोटवून घेतलेले डॉ. अशोक दामोदर रानडे यांनी शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीताला आपल्या सौंदर्यशास्त्रीय दृष्टीने मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले होते. डॉ. रानडे यांनी लोकसंगीताला जी सैद्धांतिक बैठक प्राप्त करून दिली ती निश्चितच अजोड अशी आहे.

भारतीय संगीताचे आदिम संगीत, लोकसंगीत, धार्मिक संगीत, लोकप्रिय संगीत, शास्त्रीय संगीत असे वर्गीकरण करून त्यामागची शक्तिस्थाने शोधण्याचा प्रयत्न सातत्याने डॉ. अशोक रानडे यांनी केला. त्यांनी मुंबई विद्यापीठात संगीत विभागाची स्थापना करून त्या विभागाची सतत प्रगती घडवून आणली. आकाशवाणी, एन.सी.पी.ए., चव्हाण केंद्र अशा संस्थांमधून महत्त्वाच्या पदांवर काम करीत असताना डॉ. रानडे यांनी आयुष्यभर संगीतसेवा आणि नाट्यसेवा केली.

डॉ. रानडे यांनी मराठीत १०, इंग्रजीत १३ अशी पुस्तके लिहिली. याबरोबरच त्यांनी संगीत दिग्दर्शन/संयोजन अनेक वेळा केले. त्यांना 'चतुरंग परिवारा'चा जीवनगौरव पुरस्कार, भारत सरकारचा संगीत नाटक अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा कलादान पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. त्यांचे संगीत क्षेत्रात महत्त्वाचे असे योगदान आहे.

(छाया : लक्ष्मण ठाकूर)




**पनवेल : गणेशोत्सव अवघ्या एक महिन्यावर आल्याने मूर्तिकारांची लगबग वाढली आहे. सगळीकडील मूर्तिशाळांमध्ये कारागीर दिवसरात्र मेहनत घेत आहेत. मूर्ती बनविण्याचा आनंद काही वेगळाच असतो. कल्हे गावात भास्कर दिघे यांच्या परिवारात पारंपरिक पद्धतीने गणपती साकारताना टिपलेले हे छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर



### चालण्याच्या व्यायामामुळे हृदयरोगाचा धोका कमी

काही वर्षांपासून हृदयासंबंधी आजारांचा धोका वाढला आहे. यामागे चुकीची जीवनपद्धती हे प्रमुख कारण आहे, स्पष्टच आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दरवर्षी दोन कोटी लोकांचा या आजारामुळे मृत्यू होतो. शारीरिक हालचालींचा अभाव, पोषक आहाराची कमतरता, तंबाखू आणि दारूचे व्यसन हे यामागील प्रमुख कारणे आहेत. परंतु हृदयासंबंधी अनेक आजारांपासून बचाव करता येऊ शकतो, असे एका अभ्यासात स्पष्ट झाले. त्यानुसार या आजाराचा धोका कमी करण्यासाठी सर्वात सोपा उपाय म्हणजे चालण्याचा व्यायाम होय. रोज काही मिनिटे चालल्याने हृदयरोगाचा धोका खूपच कमी करता येतो.

हॉवर्ड मेडिकल स्कूलच्या अभ्यासानुसार दररोज २१ मिनिटे चालल्याने हृदयरोगाचा धोका ३० टक्के कमी होतो. याचाच अर्थ एका आठवड्यात अडीच तास चालणे आवश्यक आहे. यामुळे वजन, रक्तदाब, कोलेस्टॉल कमी करण्यास मदत होते. तर स्मरणशक्ती वाढवण्याबरोबरच हृदयरोग, मधुमेह आणि कर्करोगाचा धोका कमी करता येतो. अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या म्हणण्यानुसार चालने हा हृदयाच्या आरोग्यासाठी सर्वात चांगला व्यायाम आहे. यामुळे फक्त ऊर्जाच तर मिळते, परंतु कोलेस्टॉल आणि रक्तदाब कमी करण्यासाठीही मदत होते.

हॉवर्ड मेडिकल स्कूलच्या अभ्यासानुसार हृदयाच्या आरोग्यासाठी ताजी फळे आणि भाज्यांचा आहारात अधिक प्रमाणात समावेश करावा, प्रक्रिया केलेले पदार्थ आणि व्यसनांपासून दूर राहणे आवश्यक आहे. दरम्यान, सध्या धकाधकीच्या जीवनामध्ये माणसाची जीवनशैलीच बदलून गेली आहे. आधुनिक युगात मानवाने काही गोष्टी आत्मसात केल्या तरी काही गोष्टींवर पूर्ण दुर्लक्ष केले आहे. यात व्यायाम करण्याकडे दुर्लक्ष झाला आहे. या मुळे अनेक आजार पुढे येतात. कालांतराने वेळ निघून गेलेली असते. त्यानुसार आजारांचा धोका कमी करण्यासाठी सर्वात सोपा उपाय म्हणजे चालण्याचा व्यायाम आहे, असे यातील तज्ञ सांगतात. रोज काही मिनिटे चाललेच पाहिजे.

# जि.प. आरक्षणात प्रस्थापितांना धक्का

**अलिबाग : प्रतिनिधी**

आगामी निवडणुकांकरिता रायगड जिल्हा परिषदेच्या जागांसाठी गुरुवारी (दि. २८) आरक्षण सोडत काढण्यात आली. या सोडतीत अनेक दिग्गजांना धक्का बसला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी अनेकांनी पूर्वतयारी केली होती, परंतु आरक्षणामुळे त्यांच्या पदरी नाराजी पडली आहे. अनेकांचे मतदार संघ राखीव झाल्याने त्यांना पर्यायी मतदार संघ शोधावा लागणार आहे. जिल्हा परिषदेचे माजी सभापती दिलीप भोईर, माजी विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, माजी सदस्य भावना पाटील, राजीव साबळे, गीता जाधव यांचाही त्यात समावेश आहे.




माणगावचे ॲड. राजीव साबळे आणि प्रमोद घोसाळकर इच्छुक असलेला लोणेरे मतदार संघ अनुसूचित जमातीसाठी राखीव झाला आहे. जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर यांचा मापगाव मतदार संघ ओबीसींसाठी राखीव झाल्याने त्यांना नवीन मतदार संघ शोधावा लागणार आहे. जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे यांचा चौल मतदार संघ सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाल्याने त्यांची अडचण झाली आहे. जिल्हा परिषदेच्या माजी महिला व बालकल्याण समिती सभापती गीता जाधव यांचा महागाव मतदारसंघ ओबींसींसाठी राखीव झाल्याने त्यांची संधी हुकणार आहे.

शेकापचे माणगाव तालुका चिटणीस रमेश मोरे इच्छुक असलेला गोरेगाव मतदार संघ सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाला आहे. त्यांना पत्नी आरती मोरे यांना उभे करावे लागेल असे दिसते. अलिबागच्या शहापूर मतदार संघातून राष्ट्रवादीचे अमित नाईक तयारीत होते. परंतु तो मतदार संघ अनुसूचित जमातीसाठी राखीव झाल्याने त्यांच्या मनसुब्यावर पाणी पडले आहे. वहूर मतदार संघ ओबीसी महिलांसाठी राखीव झाल्याने माजी सदस्य जितेंद्र सावंत यांची अडचण झाली आहे. याशिवाय किशोर जैन (नागोठणे), चंद्रकांत कळंबे (देवळे) यांचेही मतदार संघ राखीव झाल्याने त्यांची संधी हुकण्याची शक्यता आहे. रोहा तालुक्यातील वरसे मतदार संघ अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव झाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर पाटील यांची अडचण होणार आहे.

या आरक्षण सोडतीतून अनेकांची सुटकाही झाली आहे. माजी अध्यक्षा ॲड. नीलिमा पाटील यांचा पाबळ मतदार संघ ओबीसी महिलांसाठी राखीव झाल्याने त्यांना पुन्हा संधी मिळणार आहे. मोर्बा मतदार संघ खुला राहिल्याने अस्लम राऊत यांना संधी मिळू शकते.

पेण तालुक्यात पूर्वी जिल्हा परिषदेचे पाच मतदार संघ होते. फेररचनेमध्ये ही संख्या एकने वाढून सहा झाली आहे. त्यातील पाच मतदार संघ हे महिलांसाठी राखीव झाले आहेत. यामध्ये जिते, दादर, वढाव, वडखळ सर्वसाधारण महिला तर पाबळ मतदारसंघ ओबीसी महिलांसाठी राखीव आहे. एकमेव शिहू मतदार संघ सर्वसाधारण राहिला आहे. म्हसळा तालुक्यातील पाभरे व वरवठणे हे दोन्ही मतदार संघ सर्वसाधारण राहिले आहेत. त्यामुळे येथे सर्वच पक्षांच्या इच्छुकांची गर्दी असेल. आरक्षण जाहीर झाल्यामुळे इच्छुक तयारीला लागले आहेत. आपले मूळ मतदार संघ आरक्षित झाल्यामुळे पर्यायी मतदारसंघ शोधून तेथे तयारी करावी लागणार आहे. आशा उमेदवारांनी वाटाघाटी सुरू केल्या आहेत.

# कारगिल युद्धातील जवानांनी खोपोलीत रोमहर्षक आठवणींना दिला उजाळा

**खोपोली : प्रतिनिधी**

माजी सैनिक सेवा संघटना–खोपोली आणि सैनिक फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कारगील विजय दिनानिमित्त येथील माध्यमिक शाळेत आयोजित केलेल्या कार्यक्रमात भारतीय स्थलसेना, वायुसेना व नौसेना दलातील माजी सैनिकांनी भारत–पाक युद्धातील साहसी, थरार अनुभव व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अमर जवान ज्योत प्रज्वलित करून शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पूर्व वायुसेना रडार ऑपरेटर भरत काकडे यांनी दाखविलेल्या जादुच्या विविध प्रयोगांसोबत फडकवलेल्या तिरंगा ध्वजाला राष्ट्र गीताने मानवंदना देण्यात आली.

मेजर विवेक बोडस यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक, मानसिक, विकासासोबत इतर आवश्यक माहिती दिली. मुख्याध्यापक मोहन पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. माजी सैनिक प्रकाश महाडीक, बी. एन. भोसले, विजय जगताप, गुरुनाथ तावडे, जे. पी. यादव, ए. पटनायक, रमाकांत मोदी, शिवाजी धनावडे, प्रकाश उतेकर, भरत काकडे, रंजना रमाकांत शिंदे, जयसिंग कदम, सैनिक मित्र गोपाळ हंचलीकर इत्यादी मान्यवरांसह विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या कार्यक्रमाला उपस्थित होते.




(छाया : विनायक माडपे)

# पेणमध्ये पेट्रोल पंप कामगारांकडून पैशांचा अपहार; गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेट्रोल विक्रीतून आलेल्या पैशांचा अपहार केल्याप्रकरणी पेणमधील पंकी पेट्रोल पंपावरील दोन कामगारांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत माहिती अशी की, फिर्यादी सदाशिव मुंढे (रा. स्वप्नपुर्ती रेसीडेन्सी, अंतोरा फाटा, पेण) हे मॅनेजर म्हणून नोकरी करत असलेल्या पंकी पेट्रोलपंप येथे पेट्रोल भरण्याचे काम करणारे कामगार महेशकुमार राजेंद्र यादव (वय २५) व संदीप यादव हे मंगळवारी (दि. २६) कामावर असताना त्यांनी दिवसभर पेट्रोलची विक्री केली व संगनमत करून दिवसभरात झालेल्या विक्रीतून २२ हजार २९६ रुपये हिशोबात कमी देवून पळून गेले.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार राजेंद्र भोनकर करीत आहेत.

# नेरळमध्ये १०१वे नेत्रचिकित्सा शिबिर

## ■ लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट व कांदळगावकर दाम्पत्याचा उपक्रम

**कर्जत : बातमीदार**

पनवेल येथील लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि नेरळ येथील नितीन कांदळगावकर, नम्रता कांदळगावकर यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळ येथील जेनी टूलीप शाळेत नुकताच १०१वे नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ८०रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली, त्यापैकी मोतीबिंदू दोष आढळल्याने २३ रुग्णांच्या डोळ्यांवर लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या पनवेल येथील हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया केली जाणार आहे.



या १०१व्या नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी आयोजक कांदळगावकर दाम्पत्य तसेच अनिल पटेल, अनिल जैन, डॉ. वृषाली पाटील आदी उपस्थित होते. डॉ. वृषाली पाटील, तसेच श्वेताली आंग्रे, श्रुती गायकवाड, शिवाजी महाडिक, सृष्टी कुरुगले, विनोद पाचघरे, अंकुश साखरे, जितेंद्र जाधव यांनी शिबिरार्थींची नेत्र तपासणी केली. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी मिलिंद कोशे, विकास अहिर, सखाराम कडाली यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिक्षकाला मारहाण

## आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

मुलाची शिष्यवृत्ती जमा का केली नाही, अशी विचारणा करीत शिक्षकाला शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नंदकुमार पांडुरंग केकाणे (वय ५६) हे लोणशी आदिवासीवाडी येथील शाळेत पहिली ते चौथीपर्यंतच्या मुलांना एकत्रित शिकवत असताना बुधवारी (दि. २७) दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास रमेश यशवंत काटकर (वय ३५) यांनी शाळेच्या वर्गात येऊन तू माझ्या मुलाची शिष्यवृत्ती जमा का केली नाहीस, अशी विचारणा केली. व शिक्षक नंदकुमार केकाणे यांना शिवीगाळी केली तसेच शाळेमध्ये असलेली पाण्याची प्लॅस्टिकची बादली त्यांच्या डोक्यात मारून दुखापत केली.

या प्रकरणी शिक्षक नंदकुमार केकाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रमेश काटकर याच्यावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास सहाय्यक निरीक्षक श्री. लहांगे करीत आहेत.

# कर्जत येथे विवाहितेचा छळ; चौघांवर गुन्हा दाखल

**कर्जत : बातमीदार**

शहरातील विवाहितेचा हुंड्यासाठी छळ होत होता, त्याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात पती तसेच सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल झाला आहे.



लोअर परेल मुंबई येथील तरुणीचा कर्जत शहरातील अमन जैन या तरुणांबरोबर २०१८मध्ये लग्न झाले होते. मात्र लग्नानंतर त्याने परदेशात जाण्यासाठी माहेरून पैसे आणण्याची मागणी केली. ती विवाहितेच्या आई, वडिलांनी पूर्ण केली नाही. त्यामुळे पती, नणंद, सासु, सासरे यांनी विवाहितेचा शारिरीक व मानसीक छळ करीत होते. त्यामुळे विवाहित महिला आपल्या मोहरी निघून गेली आणि त्यांनी पती तसेच सासू, सासरे आणि नणंद यांच्या विरुद्ध रीतसर तक्रार दाखल केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात भादंविक ४९८,३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार जगताप करीत आहेत.



# आंजप ग्रामस्थांची आरोग्य तपासणी

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील आंबिवली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अखत्यारीत असलेल्या आंजप येथील आरोग्यवर्धिनी उपकेंद्रात आरोग्य तपासणी आणि लसीकरण शिबिर घेण्यात आले. या शिबिरात गावातील प्रत्येक व्यक्तीची तसेच परिसरातील ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करण्यात आली.



समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रूपेश सोनावळे, डॉ. कृपाली सोनावळे यांनी रुग्णाची तपासणी केली. या वेळी रक्त तपासणी, लसीकरण करण्यात आले. या वेळी दुर्धर आजार आढळलेल्या रुग्णांवर कर्जत उपजिल्हा रुग्णालय, कशेळे ग्रामीण रुग्णालय आणि आवश्यकतेनुसार कामोठे एमजीएम रुग्णालयात तपासणी केली जाणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

# आषाणे धबधबा ठरतोय गर्दीचे केंद्र

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या आषाणे येथील धबधबा पर्यटकांचे आकर्षण बनला आहे. हा धबधबा पावसाळ्यातील चार महिन्यात लाखो पर्यटकांना आपल्याकडे खेचून घेण्यात यशस्वी ठरतो. त्याबरोबरच हा धबधबा अनेकांच्या उदरनिर्वाहाचे साधनही ठरला आहे.

कर्जत–कल्याण रस्त्यावर आषाणे गावाच्यामागील बाजूस असलेल्या डोंगरावरून उडणारे पाण्याचे तुषार झेलण्यासाठी पर्यटक वर्षा सहलीच्या निमित्ताने इकडे येतात. या धबधब्याचे आकर्षण म्हणजे डोंगरावरून उतरणारे फेसाळणाऱ्या पाण्याचे तीन प्रवाह. तेथे जाणे सहज शक्य असल्याने पर्यटक या ठिकाणी गर्दी करतात. लोकल ट्रेनने आलेल्या पर्यटकांचे पाय उमरोली गावातून या धबधब्याकडे वळतात. या रस्त्याने जाताना एक लहान ओढा लागतो. तो पार करताना गतवर्षी एका चिमुरडीसह दोघांचा बळी गेला होता.

या धबधब्याच्या डोहात बसून कुटुंबासह आलेले पर्यटक वर्षा सहलीचा आनंद घेऊ शकतात. मात्र मुख्य डोहात कोसळणाऱ्या पाण्यासोबत अनेकदा दगड वाहून येतात. हे दगड धबधब्याखाली असलेल्या पर्यटकांच्या डोक्यात पडून अपघात होऊ शकतो. अन्य कुठेही या धबधब्यावर धोका नसल्याने पर्यटक कुटुंबकबिल्यासह वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी आषाणे धबधब्यावर येतात.

या धबधब्यावर येणाऱ्या पर्यटकांना उमरोली आणि आषाणे गावात रुचकर, गावरान पद्धतीचे जेवण सहज उपलब्ध होते. डिकसळ नाक्यावरील गरमागरम वडे, भजी प्रसिद्ध आहेत. त्यामुळे पावसात भिजल्यानंतर त्याची चवदेखील सहज घेता येते. चहा, कॉफी आणि मक्याची कणसे सोबतीला असतात.

सध्या आषाणे येथील धबधबा पूर्ण क्षमतेने प्रवाहीत झाला आहे. त्यामुळे सुटीच्या दिवशी, वीकेण्डला येथे हजारोच्या संख्येने पर्यटक येत आहेत.



(छाया : संतोष पेरणे)

# खोपोलीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## खिदमते खल्क सामाजिक संस्थेचा शैक्षणिक उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

खिदमते खल्क सामाजिक संस्थेच्या वतीने खालापूर तालुक्यातील शाळांमधून दहावी व बारावी परीक्षेत उत्तम गुण प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा नुकताच खोपोलीतील मुस्लिम कम्युनीटी हॉलमध्ये सत्कार करण्यात आला. या वेळी तहसीलदार अय्युब तांबोळी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




(छाया : विनायक माडपे)

या कार्यकर्माचे सूत्रसंचालन मुज्रफर मांडलेकर यांनी केले. खोपोलीचे पोलीस निरीक्षक शरीष पवार, माजी नगरसेविका जीनी सॅम्युअल, माजी नगरसेवक राजेंद्र फक्के, मुस्लिम वेलफर ट्रस्टचे अध्यक्ष आतिक खोत, सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.शेखर जांभळे, खिदमते खल्कचे सदस्य अश्फाक पटेल, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजीक संस्थेचे गुरुनाथ साठेलकर, अश्फाक लोगडे, शमसुद्दिन शेख, मुस्तुफा दुस्ते यांच्यासह खोपोलीतील विविध क्षेत्रातील मान्यवर या सोहळ्याला उपस्थितीत होते. हा विद्यार्थी गुणगौरव सोहळा यशस्वी करण्यासाठी खिदमते खल्कचे सर्व सदस्य आणि महिला पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

# आगरदंडा येथे फळरोपांचे वाटप

## अदानी फाउंडेशनचा उपक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

शाश्वत आजिविका विकास कार्यक्रमाअंतर्गत अदानी फाऊंडेशनने गुरुवारी (दि. २८) आगरदंडा ग्रामपंचायत कार्यालयात १५ शेतकऱ्यांना हापूस आंबा आणि फणसाच्या २७० रोपांचे वाटप केले. या वेळी वृक्षारोपणही करण्यात आले.

(छाया : संजय करडे)



शाश्वत आजिविका विकास कार्यक्रमाअंतर्गत अदानी फाउंडेशनने फलोत्पादनावर भर दिला आहे. शेतकऱ्यांनी फळ झाडांची लागवड केल्यास त्यांच्या उपजीविकेला आधार होणार आहे. यासाठी फाउंडेशन तर्फे शेतकऱ्यांना फळ झाडांची रोपे वाटपाचा उपक्रम राबवण्यात येत असल्याची माहिती दिघी पोर्ट लिमिटेडचे पर्यावरण प्रमुख विलास शिर्के यांनी दिली.

अदानी फाउंडेशनच्या वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा हेतू सांगितला. या वेळी शेतकऱ्यांना फळ झाडांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. ग्रापपंचायत कार्यालय परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. आगरदंडा सरपंच वैशाली डोंगरीकर यांच्यासह शिक्षकवृंद, अंगणवाडीसेविका आणि शेतकरी या वेळी उपस्थित होते. भरत मोरे यांनी आभार मानले.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost. |
|---|---|---|
| Tend-29/22-23 7000023966 | Work of LILO arrangement of 100kV Jite - Thal - Gail Tap line at 100kV Gail S/stn under EHV (O&M) Dn. Panvel. | **Rs. 218.99 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee - Rs. 5000/- + GST Submission of bids from 29.07.2022 to 07.08.2022 up to 23:59:00 hrs, Opening date :- 08.08.2022 @ 11:00 Hrs.**
For further details visit our website
**https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8356921558 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# मंकीपॉक्स प्रतिबंधासाठी नियोजन

## परदेशातून नवी मुंबईत आलेल्या नागरिकांवर पालिका ठेवणार लक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

मंकीपॉक्सचा संभाव्य धोका लक्षात घेऊन आधीच खबरदारी घेणे आवश्यक असून महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी आरोग्य विभागाची बैठक घेत परदेशातून नवी मुंबईत आलेल्या नागरिकांची माहिती घ्यावी व त्यांची आरोग्य स्थिती जाणून घ्यावी, असे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या २३ नागरी आरोग्य केंद्रांमार्फत त्यांच्या कार्याक्षेत्रातील परदेशातून आलेल्या नागरिकांच्या घरी भेट दिली जाणार आहे.

कोरोना संक्रमणातून काहीसे सावरत असतानाच आता मंकीपॉक्स या नव्या आजाराचे संकट जगासमोर उभे ठाकले असून जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्सला जागतिक आणीबाणी म्हणून जाहीर केलेले आहे. या आजाराचा रुग्ण महाराष्ट्र राज्यात अद्याप सापडलेला नसला तरी केरळ व दिल्ली येथे एकूण चार रुग्ण आढळलेले आहेत. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महापालिका सज्ज झाली आहे.

पावसाळ्यात होणाऱ्या आजारांची लक्षणे साधारणत: सारखीच असल्याने



मंकीपॉक्सच्या लक्षणांबाबत नागरिकांना माहिती असावी या दृष्टीने व्यापक जनजागृती करण्याच्या सूचनाही आयुक्तांमार्फत देण्यात आल्या. या वेळी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. धनवंती घाडगे उपस्थित होते.

ऑर्थोपॉक्स व्हायरस या विषाणूमुळे मंकीपॉक्स आजार होतो. अंगभरून ताप येणे, डोके दुखी, अंगदुखी, प्रचंड थकवा जाणवणे, घाम येणे, अंगावर पुरळ येणे, कानामागे अथवा काखेत लसीका ग्रंथींना सूज येणे अशी लक्षणे मंकीपॉक्सच्या आजारात जाणवत असून लागण झाल्यानंतर साधारणत: सहा ते १३ दिवस इतका मंकीपॉक्स आजाराचा कालावधी आहे. अंगावर पुरळ उठण्यापूर्वी एक ते दोन दिवस आधीपासून ते त्वचेवर येणाऱ्या फोडांवरील खपल्या पडेपर्यंत किंवा त्या पूर्णपणे बऱ्या होईपर्यंत मंकीपॉक्सचा संसर्ग कालावधी आहे.

### आरोग्य विभागाला आयुक्तांचे निर्देश

**नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सतर्कतेने जलद पावले उचलावीत व मंकीपॉक्सबाबत नागरिकांना माहिती होण्यासाठी त्याची लक्षणे तसेच तो होऊ नये म्हणून घ्यावयाची खबरदारी या अनुषंगाने जनजागृतीवर भर द्यावा. त्याचप्रमाणे नागरिकांसारखेच खासगी डॉक्टरांनाही याविषयी माहिती करून द्यावी, असे निर्देश आयुक्त अभिजित बांगर यांनी आरोग्य विभागास दिले.**

### लक्षणे जाणवल्यास चाचण्या करणे गरजेचे

***मंकीपॉक्स आजाराने ग्रस्त व्यक्तीशी शरीर द्रव, लैंगिक संपर्क, जखम व घाव यातील स्त्राव याद्वारे थेट शारीरिक संपर्क आल्यास किंवा बाधीत व्यक्तींनी वापरलेले कपडे वापरल्यास, बाधीत व्यक्तीच्या जास्त काळ संपर्कात आल्यास अथवा त्या व्यक्तीच्या श्वसन मार्गातून बाहेर पडणाऱ्या मोठ्या थेंबांवाटे मंकीपॉक्स आजाराचा प्रसार होऊ शकतो. त्यामुळे या आजाराबाबत गंभीर राहून संलग्न लक्षणे जाणवल्यास आवश्यक वैद्यकीय चाचण्या करून घेणे महत्त्वाचे आहे.***




# डॉ. आंबेडकरांच्या निवासस्थान चित्राचा ऐरोलीतील स्मारकात होणार समावेश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ऐरोली येथे भव्यदिव्य असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक बांधण्यात आले आहे. या स्मारकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संपूर्ण जीवनप्रवास चित्र गॅलरीच्या माध्यमातून रेखाटलेला आहे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली व त्यांच्यावरील अनेक पुस्तके आहेत, मात्र या गॅलरीत बाबासाहेब आंबेडकरांच्या राजग्रह या निवासस्थानाचे फोटो नाहीत. याबाबत नालंदा बुद्धविहार संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष दिपक गायकवाड यांनी हे चित्र गॅलरीत असावे, अशी मागणी केली होती. त्यास यश आले असून लवकरच राजग्रह या आंबेडकरांच्या घराचे चित्र या गॅलरीत बसवण्यात येणार आहे.

स्मारकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या ज्या ठिकाणी शिक्षण घेतले आहे किंवा निवास केलेला आहे अशा सर्व ठिकाणाचा चित्र गॅलरीमध्ये उल्लेख केलेला आहे, पण ज्या महामानवाने आपल्या कुटुंबाची व स्वतःच्या तब्येतीची तमा न बाळगता या भारत देशाची राज्यघटना लिहिली, आपली चार मुले गमावली आहेत, त्यांनी स्वतःसाठी किंवा कुटुंबासाठी कुठलीही मालमत्ता जमा केली नाही, परंतु शेवटच्या कार्यकाळात त्यांनी एकमेव दादर-मुंबई येथे राजग्रह नावाचे घर बांधले. आज ते राजग्रह पाहण्यासाठी देशातीलच नव्हे तर विदेशातील नागरिकांची दररोज गर्दी उसळत आहे. म्हणून त्या राजग्रह या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानाचा स्मारकामधील



चित्र गॅलरीमध्ये समावेश करून नवी मुंबईमधील नागरिकांना राजग्रह या निवासस्थानाची ओळख व्हावी यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नालंदा बुद्धविहार संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष दिपक गायकवाड यांनी महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांना भेटून निवेदन देऊन मागणी केली होती. आयुक्तांनी या बाबत ताबडतोब समाज विकास विभागाशी संपर्क करून लवकरच राजग्रह या निवास्थानाचा चित्र गॅलरीमध्ये समावेश करण्याचे आदेश दिले.

## निवडक

### एचपी कंपनीच्या सिलिंडरची चोरी

**पनवेल :** ट्रकमध्ये ठेवलेल्या एचपी कंपनीच्या आठ गॅस सिलिंडरची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. कृष्णकुमार शिवसहाय सिंह (वय ४५) यांनी त्यांच्या ताब्यातील ट्रक (क्र. एमएच ०४ एएफ २०९९) हा पनवेल बसस्थानक येथील मंदिराजवळ उभा करून ठेवला असता अज्ञात चोरट्याने या ट्रकमधील एचपी कंपनीचे आठ गॅस सिलिंडर ज्यांची किंमत जवळपास २४०० रुपये इतकी आहे ते चोरून पासार झाला. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कामावर गेलेला व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** कामावर जातो असे सांगून एक व्यक्ती घराबाहेर पडला ती अद्याप घरी न परतल्याने हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



नविद मोहसीन अधिकारी (वय ५४, रा. पाडा मोहल्ला पनवेल) असे त्यांचे नाव असून रंग गोरा, उंची पाच फूट सहा इंच, बांधा मजबूत, केस काळे-पांढरे, दाढी कोरलेली असून अंगात शर्ट, काळी पॅन्ट व पायात काळी चप्पल घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार संदीप नवले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### भानघर येथून युवक हरवला

**पनवेल :** येथील अभ्युदय बँक येथे गेलेला तालुक्यातील भानघर येथील युवक अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



अभिषेक शिवमुनी विश्वकर्मा (वय ३२, रा. भानघर) असे त्याचे नाव असून रंग गोरा, उंची पाच फूट सहा इंच, बांधा मजबूत, डोक्याचे केस काळे लांब, दाढी वाढलेली असून अंगात लाल टी-शर्ट व काळी पॅन्ट घातलेली आहे, तसेच पायात काळी सँडल आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार संदीप नवले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी मावस भावाला पोलिसांकडून अटक

**पनवेल : वार्ताहर**

अनैतिक संबंध ठेवणाऱ्या मावस भावाच्या त्रासाला कंटाळलेल्या एका विवाहितेने उंदीर मारण्याचे औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

गत एप्रिल महिन्यात नवीन पनवेल भागात ही घटना घडली होती. त्या वेळी विवाहितेने आत्महत्येमागील कारण सांगितले नव्हते, मात्र मृत्यूनंतर तिच्या मोबाईलमध्ये सापडलेल्या कॉल रेकॉर्डिंगवरून तिने मावस भावाकडून होत असलेल्या अत्याचाराला व छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. खांदेश्वर पोलिसांनी या घटनेतील मृत विवाहितेच्या मावस भावाविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

या घटनेतील मृत विवाहिता ही पती व दोन मुलांसह नवीन पनवेल येथे राहण्यास होती. तिचा पती कंटेनर चालवित असल्यामुळे तो दोन-तीन दिवस बाहेर राहत असत. या दरम्यान विवाहितेचा मावस भाऊ घरी नेहमी जात होता. दोन वर्षांपूर्वी आरोपीने विवाहितेसोबत जबरदस्तीने अनैतिक संबंध ठेवण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपी तिला नेहमी मानसिक व शारीरिक त्रास देऊन शिवीगाळ करीत होता. आरोपीच्या या सततच्या त्रासाला कंटाळून विवाहितेने गत एप्रिल महिन्यात उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्या केली. काही दिवसानंतर विवाहितेच्या कुटूंबियांनी तिच्या मोबाईलची तपासणी केली असता, त्यात तिने आत्महत्या करण्याच्या एक दिवसापूर्वीचे आरोपीसोबतच्या संवादाची रेकॉर्डिंग आढळली. आरोपी विवाहितेच्या घरी गेला असता रूमचा दरवाजा न उघडल्याने आरोपीने विवाहितेच्या डोक्यात कुलूप फेकून मारले होते. याबाबतची माहिती विवाहितेच्या मोठ्या मुलीने आपल्या वडिलांना दिली. यावरून आरोपी विवाहितेला नेहमी मानसिक, शारीरिक त्रास देऊन शिवीगाळ करीत असल्यामुळे तिने आत्महत्या केल्याचे तिच्या पतीच्या लक्षात आले. त्यानंतर विवाहितेच्या पतीने खांदेश्वर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार आरोपीविरोधात शिवीगाळ व आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# खांदा कॉलनीत लाखोंचा गुटखा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनी, सेक्टर ९ येथील गाळ्यातून दोन लाख ५२ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा गुन्हे शाखा कक्ष ३ने जप्त केला आहे. या प्रकरणी हरी दौलत बुंधे व रहमान यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखा कक्ष ३ला गुप्त बातमीदारामार्फत खांदा कॉलनी येथील सेक्टर ९मधील गाळ्यामध्ये सुगंधित सुपारी व सुगंधित पान मसाला विक्रीकरीता साठवून ठेवला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला व संबंधित गाळ्यात जाऊन धाड टाकली. गाळ्याची झडती घेतली असता दोन लाख ५२ हजार रुपये किमतीचा गुटखा सापडला. या प्रकरणी हरी दौलत बुंधे यांच्याकडे चौकशी केली असता रहमान नामक व्यक्तीकडून खरेदी केला असल्याचे त्याने सांगितले.

# कामोठ्यात दुकलीकडून महिलेचे दागिने लंपास

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील राहणाऱ्या मुलाला भेटण्यासाठी सिंधुदुर्ग येथून आलेल्या एक ६५ वर्षीय महिला भाजी घेण्याकरिता घराबाहेर पडली असता दोन अज्ञातांनी तुम्हाला रेशन फुकटमध्ये देतो असे सांगून अंगावरील दागिने हातचलाखीने लंपास केले. याबाबत त्या महिलेने कामोठे पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

कामोठे वसाहतीतील सेक्टर १७ येथे सध्या राहत असलेली ६५ वर्षीय महिला मुलाला भेण्यासाठी कामोठे येथे आली आहे. सकाळच्या सुमारास घरामध्ये भाजीपाला घेण्याकरिता घराबाहेर पडली होती. या वेळी येथून घरी पायी चालत जात असताना दोन अज्ञात व्यक्तींनी या महिलेला आमचे साहेब कट रेशनिंग देतात, तुम्हालाही रेशन मिळेल, असे सांगून अंगावरील सोन्याचे दागिने काढून ठेवावे लागतील असे सांगत महिलेच्या अंगावरील ४६ हजार रुपये किमतीचे दागिने लंपास केले.

# घरफोडी करून १० लाखांचे दागिने चोरले

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात चोरट्याने नवीन पनवेल सेक्टर १८मधील अष्टविनायक ओनर्स या इमारतीत भरदिवसा घरफोडी करून तब्बल १० लाख रुपये किंमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात चोरट्याविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

नवीन पनवेल सेक्टर १८मधील अष्टविनायक ओनर्स या इमारतीत मंगेश पुरुषन (६३) हे पत्नी, दोन मुले व सून यांच्यासोबत राहण्यास आहेत. मंगेश पुरुषन हे कामावर गेल्यानंतर त्यांच्या पाठोपाठ त्यांचा मुलगा व पत्नीदेखील कामावर गेले, तर लहान मुलगा कामानिमित्त वाशी येथे गेला. याचदरम्यान, अज्ञात चोरट्याने पुरुषन यांच्या घराचा कडीकोयंडा तोडुन त्यांच्या घरात प्रवेश केला. त्यांच्या कपाटात असलेले सुमारे १० लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

मंगेश पुरुषन हे दुपारच्या सुमारास कामावरून आपल्या घरी आल्यानंतर घरामध्ये चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# नेरूळमध्ये तब्बल २०० किलो प्लास्टिक जप्त

## ७५ हजारांचा दंडही केला वसूल

**नवी मुंबई : बातमीदार**

शासनाने २०१८ साली प्लास्टिक, थर्माकॉलच्या वापरावर बंदी घातली आहे, मात्र तरीही नवी मुंबईत अद्यापही लपूनछपून प्लास्टिक पिशव्यांचा वापर सुरू आहे. नेरूळ विभाग कार्यालयाने शुक्रवारी (दि. २९) सकाळी संपूर्ण विभागात दुकानांमध्ये छापे टाकले. यात तब्बल २०० किलो प्लास्टिकच्या जप्त करण्यात आल्या व ७५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.



पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्यांवर व पिशव्या ठेवणाऱ्या दुकानदारांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, परिमंडळ १चे उपायुक्त दादासाहेब चाबूकस्वार, घनकचरा विभागाचे उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली नेरूळ विभागात कारवाई करण्यात आली. त्यानुसार विभाग अधिकारी सुनील पाटील यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात येऊन, या पथकाकडून थेट दुकानांवर धाडी टाकण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या कारवाईत उपमुख्य अभियंता पंढरीनाथ चवडे, अर्जुन बिराजदार, सुधाकर मोरे, सुरेश लगदिवे, नेरूळ विभागाचे स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली.

एकूण १५ दुकानदांकडे सिंगल यूज प्लास्टिकचा वापर व विक्री आढळून आल्यामुळे त्यांच्याविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात आली. एकूण रक्कम ७५ हजार रु. इतका दंड वसूल करण्यात आला आणि अंदाजे २०० किलो इतका प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला.

# हिंदूंनी स्वत:च्या सुरक्षेसाठी सजग राहावे -उद्धव खराडे


**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

लव्ह जिहाद-धर्मांतर मोठ्या प्रमाणावर होत आहे. देशात आज सामान्य हिंदू धोक्यात आहेत. सुरक्षित जीवन जगायचे असेल, तर आपणच स्वत:ची सुरक्षा केली पाहिजे. त्यासाठी हिंदूंनी सजग राहावे, असे आवाहन राष्ट्रीय बजरंग दल उद्धव खराडे यांनी नेरूळ येथे बोलताना केले.



राष्ट्रीय बजरंग दल कोकण प्रांत, जिल्हा प्रमुख, विभाग प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक नेरूळमध्ये आयोजित करण्यात आली होती. या वेळी ार्गदर्शन करताना खराडे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आपले राष्ट्रीय अध्यक्ष प्रविण तोगडिया देश- विदेशातील हिंदूंना एकसंघ करण्यासाठी झटत आहेत. तोगडिया यांच्या नेतृत्वाखाली आम्ही हिंदू धर्म जागरण करण्यासाठी काम करीत आहोत.

सध्याच्या काळात धर्मांध शक्ती फोफावत चालली आहे. शत्रू अधिक बलवान होत आहे. अशा परिस्थितीत आपणच आपल्या आई-बहिणीचे रक्षण करणे आपले काम नव्हे कर्तव्य आहे, असे उद्धव खराडे यांनी सांगितले.




# उल्हास नदीवरील दहिवली पुलाला भगदाड

(छाया : संतोष पेरणे)



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील उल्हास नदीवरील दहिवली-मालेगाव पुलावर गुरुवारी (दि. २८) रात्री मोठे भगदाड पडले असून, त्यामुळे पुलावरून मोठी गाडी जाण्यास अडथळे येत आहेत. या खड्ड्यात झाडाच्या फांद्या तोडून उभ्या केल्या आहेत.

नेरळ-कळंब राज्यमार्गावरील दहिवली-मालेगाव येथे उल्हास नदीवर १९७०च्या दशकात हा पूल बांधण्यात आला. कमी उंचीच्या आणि १५० मीटर लांब असलेल्या या पुलावरून दरवर्षी पावसाळ्यात पाणी वाहत असते. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थ अडकून पडतात. या ठिकाणी नव्याने जास्त उंचीचा पूल बांधण्यात यावा, अशी मागणी अनेक वर्षे केली जात आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून नवीन पुलाच्या निर्मितीसाठी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग या पुलाच्या देखभाल, दुरुस्तीकडे लक्ष देत नाही. त्याचा फटका गतवर्षी स्थानिक वाहनचालकांना बसला होता.

दहिवली-मालेगाव येथील उल्हास नदीवरील या पुलाला गुरुवारी रात्री मोठे भगदाड पडले आहे. स्थानिक रिक्षा संघटनेचे पदाधिकारी श्रावण जाधव यांनी या मोठ्या भगदाडामुळे पुलावरून मोठी वाहने जाण्यास अडथळे येत असल्याचे सांगितले. वाहनचालकांचे लक्ष जावे यासाठी त्यांनी या खड्ड्यात झाडाच्या फांद्या तोडून उभ्या केल्या आहेत. रिक्षा संघटनेचे अध्यक्ष विजय हजारे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला संपर्क करून दहिवली-मालेगाव पुलावर पडलेल्या भगडादाची माहिती घेण्याची सूचना केली.

दरम्यान, पुलावर पडलेल्या भगदाडाबाबत आमदार महेंद्र थोरवे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्जत येथील उपअभियंता संजीव वानखेडे यांना चांगलेच खडसावल. त्यानंतर शुक्रवारी सायंकाळी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कर्मचाऱ्यांनी ते भगदाड खडी टाकून बुजवले आहे.



# मनोरुग्ण महिलेच्या चेहऱ्यावर फुलले हसू!

## माणगाव पोलिसांनी जागविला माणुसकीचा धर्म

**माणगाव : प्रतिनिधी**



(छाया : सलीम शेख)

बाजारपेठेत फिरणाऱ्या एका मनोरुग्ण महिलेला माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी सामाजिक संस्थेच्या मदतीने रत्नागिरी येथे नेऊन उपचार केले. ही महिला बरी होवून माणगाव पोलीस ठाण्यात आली आणि सर्वांच्याच चेहऱ्यावर आनंद फुलला.

माणगाव परिसरात काही मनोरुग्ण फिरत असून त्यांच्या तब्बेतीची हेळसांड होत आहे, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पाटील व निरीक्षक राजेंद्र पाटील यांना मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मिळाली होती. त्यातील काही मनोरुग्णांना सामाजिक संस्थेचे सचिन शिंदे यांच्याशी संपर्क साधून रत्नागिरी येथील मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यापैकी मंजिरी माधव पाटक या दोन महिने उपचार घेतल्यानंतर पूर्ण बऱ्या होवून माणगाव पोलीस ठाण्यात आल्या. त्यांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले असून त्या आपल्या कुटुंबात गेल्या आहेत.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत पतसंस्थांच्या वसुली अधिकाऱ्यांचे अलिबागेत प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडेरेशन, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था-रायगड आणि आदर्श नागरी सहकारी पतसंस्था-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे बुधवारी (दि. २७ ) जिल्ह्यातील पतसंस्थांमधील वसुली अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत अलिबागमधील आदर्श भवनामध्ये बुधवारी घेण्यात आलेल्या या प्रशिक्षण शिबिरात रायगड जिल्ह्यातील ६५पतसंस्थांचे ९४ प्रतिनिधी सहभागी झाले होते. रायगडचे जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी अलिबागच्या आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष व राज्य पतसंस्था फेडेरेशनचे संचालक सुरेश पाटील उपस्थित होते.



रायगड जिल्ह्यातील पतसंस्थांना नियमित वेगवेगळ्या विषयांवर प्रशिक्षण देण्याचा मानस जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांनी या वेळी व्यक्त केला. राज्य फेडेरेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे, वसुली व्याख्याते डॉ. मच्छिन्द्र मुरुडकर, बँकिंग तज्ज्ञ नितीन वाणी आणि मुरूडचे सहाय्यक निबंधक श्रीकांत पाटील या वेळी पतसंस्थांच्या वसुली अधिकारी वर्गास १०१ व १५६ कलमांची अंमलबजावणी करून वसुली कशा प्रकारे करावी, याबाबत मार्गदर्शन केले. आदर्श पतसंस्थेचे सीओ उमेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. आदर्श पतसंस्थेचे संचालक अभिजित पाटील यांनी आभार मानले.

# मुंबई-पुणे महामार्गावर मिनीबस घसरली

(छाया : अरूण नलावडे)

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील खालापूरजवळ हॉटेल रिंकीसमोर गोरेगाव मुंबई येथून लोणावळा येथे वर्षा सहलीसाठी जाणारी मिनीबस घसरून पलटी झाली. शुक्रवारी (दि. २९) संध्याकाळी झालेल्या या अपघातात मिनीबसमधील १२ प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले.



वर्षासहलीसाठी पर्यटकांना घेऊन मिनीबस गोरेगाव मुंबई येथून लोणावळा येथे जात होती. पावसामुळे महामार्ग निसरडा झाल्यामुळे खालापूरजवळच्या हॉटेल रिंकीसमोर शुक्रवारी संध्याकाळी ४.३०वाजण्याच्या सुमारास मिनीबस घसरून पलटी झाली. या अपघातात मनोज पवार (वय ५४), मनिषा पवार (वय ५०), प्रमोद पवार (वय २३), राजेश शिंदे (वय २२), शितल शिंदे (वय २१), रितेश हातोसकर

## १२ प्रवासी जखमी

(वय ३४), सुजाता हातोसकर (वय ३०), अरुण सिसोदिया (वय ४३), नितीश कुमार, सिध्देश घोडके, बबन वाघमारे, व मोहम्मद रहमान हे प्रवासी जखमी झाले.

या अपघाताची माहिती मिळताच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी या सामाजिक संस्थेचे बाबू पुजारी, गुरू साठीलकर, खालापूर उपनगराध्यक्ष राजेश पार्टे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना लागलीच खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. आरोग्य अधिकारी डॉ. अनिल शहा यांनी त्यांच्यावर उपचार केले.

शुक्रवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास खोपोली-पेण मार्गावरील हॉटेल ऋषीवनजवळ मोटरसायकल घसरून झालेल्या अपघातात खोपोलीतील तरुण लखन गोरखे जागीच ठार झाला.







(छाया : धम्मशील सावंत)

# पालीत भव्य हिंदू जनजागृती रॅली

## तहसीलदारांना मागणीचे निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

समस्त सुधागडमधील हिंदू बांधवांच्या वतीने शुक्रवारी (दि. २९) पालीमध्ये हिंदू जनजागृती रॅली काढण्यात आली होती. या वेळी भारत माता की जय, वंदे मातरम, जय शिवाजी जय भवानी या घोषणांनी पाली शहर दणाणून निघाले. या रॅलीत सुधागडसह पेण, रोहा तालुक्यातील हिंदू बांधव, विशेषतः युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी धंनजय गद्रे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांना निवेदन देण्यात आले.हिंदू बांधवांच्या नाहक हत्या होत आहेत, हिंदूंच्या श्रद्धास्थानांची विटंबना केली जात आहे, गोमातेची हत्या करण्यात येत आहेत, तसेच अनेक वनवासी, आदिवासी बांधवाना प्रलोभने दाखवून धर्मांतरणासाठी (धर्म बदली) प्रवृत्त केले जात आहे, हे प्रकार रोखण्यासाठी प्रशासनाने संबंधीतांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी या निवेदनात करण्यात आली आहे.

# पेणमध्ये प्लास्टिक वापरकर्त्यांना दंड

**पेण : प्रतिनिधी**

सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घालण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शहराला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी पेण नगरपालिकेने दोन दिवस बाजारपेठेत कारवाई केली. या वेळी सिंगल युज प्लास्टिकचा वापर करत असलेल्यांवर १० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. या वेळी सुमारे ३०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या.

पेण शहरातील व्यापारी, हातगाडीवाले, तसेच इतर छोटे मोठे दुकानदार आणि नागरिक काही दिवसांपासून राजरोसपणे सिंगल युज प्लास्टिक पिशव्या वापरत आहेत. जनजागृती करूनही सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांविरोधात पेण नगरपालिकेने आता दंडात्मक कारवाईचा



(छाया : अनिस मनियार)

बडगा उगारला आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात प्लास्टिक पिशव्याबंदीबाबत तपासणी मोहीम सुरू आहे. दररोज कर्मचारी दुकानांची तपासणी करत आहेत. यादरम्यान प्लास्टिकचा वापर करणाऱ्या दोन व्यापाऱ्याकडून १० हजार रुपये दंडवसुली केली आहे. ३०० किलोच्यावर प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या आहेत. या मोहिमेत आरोग्य अधिकारी अंकिता इसाळ, शिवाजी चव्हाण, महेश वडके, कमलाकर आवास्कर आदींसह नगरपालिकेचे कर्मचारी सहभागी झाले होते.

**सिंगल बुज प्लास्टिक वापरावर बंदी असतानाही पेण शहरातील अनेक व्यापारी आजही त्याचा वापर करत आहेत. यासाठी कर्मचाऱ्यांमार्फत शहरात तपासणी मोहीम सुरू आहे. कोणत्याही दुकानदाराने प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नये, अन्यथा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.**
**-जीवन पाटील, मुख्याधिकारी, पेण नगरपालिका**

# माथेरानमध्ये ओबीसी समाजाला प्रतिनिधित्व

**कर्जत : बातमीदार**

जानेवारी २०२२ मध्ये मुदत संपलेल्या माथेरान नगर परिषदेच्या पुढील सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी (दि. २८) आरक्षण काढण्यात आली. त्यात ओबीसी समाजाला स्थान देण्यात आले असून २०पैकी चार जागा नागरिकांनाच मागासप्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

माथेरान नगर परिषद सभागृहात उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार गुरुवारी आरक्षण सोडत काढण्यात आली. माथेरानची एकूण लोकसंख्या ४३९३ आहे. त्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या ६२३ असून, अनुसूचित जमातीची लोकसंख्या १८३ आहे. माथेरानपालिकेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना आरक्षण सोडत कामी सहकार्य केले.

### नगर परिषदेतील आरक्षण

**प्रभाग १**
अ : नागरिकांचा मागास प्रवर्ग
ब : सर्वसाधारण महिला

**प्रभाग २**
अ : सर्वसाधारण महिला
ब : सर्वसाधारण

**प्रभाग ३**
अ : नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव
ब : सर्वसाधारण

**प्रभाग ४**
अ : अनुसूचित जाती महिला,
ब : सर्वसाधारण

**प्रभाग ५**
अ : अनुसूचित जाती
ब : सर्वसाधारण महिला

**प्रभाग ६**
अ : अनुसूचित जाती महिला
ब : सर्वसाधारण,

**प्रभाग ७**
अ : अनुसूचित जमाती महिला
ब : सर्वसाधारण

**प्रभाग ८**
अ : इतर मागासवर्ग महिला
ब : सर्वसाधारण

**प्रभाग ९**
अ : सर्वसाधारण महिला
ब : सर्वसाधारण

**प्रभाग १०**
अ : इतर मागासवर्ग
ब : सर्वसाधारण महिला



# रोहा नगर परिषदेची आरक्षण सोडत जाहीर

**रोहे : प्रतिनिधी**

आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी रोहा नगर परिषदेची आरक्षण सोडत गुरुवारी प्रांताधिकारी दिघावकर, मुख्याधिकारी धीरज चव्हाण यांच्या उपस्थितीत काढण्यात आली.



(छाया : महादेव सरसंबे)

या वेळी महेश कोलाटकर, यशवंत शिंदे, वसंत शेलार, रमेश साळवी, समिर सकपाळ, उस्मान रोहेकर, मजिद पठाण, मयुर पायगुडे, यज्ञेश भांड, अमित पवार, मयुर दिवेकर, रवी चाळके, चंद्रकांत पार्टे, देविदास जाधव, अजित मोरे, पप्पु सरणेकर, राजेश कापरे, प्रकाश कोळी, आदीत्य कोंडाळकर आदी उपस्थित होते.

## पाच प्रभाग नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी

**प्रभाग क्रमांक : आरक्षण**
१ अ : सर्वसाधारण महिला,
१ ब : सर्वसाधारण,
२ अ : सर्वसाधारण महिला,
२ ब : सर्वसाधारण,
३ अ : सर्वसाधारण महिला,
३ ब : नागरिकांचा मागास प्रवर्ग,
४ अ : सर्वसाधारण महिला,
४ ब : सर्वसाधारण,
५अ : नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,
५ब : सर्वसाधारण,
६अ : नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,
६ ब : सर्वसाधारण,
७ अ : सर्वसाधारण महिला,
७ ब : सर्वसाधारण,
८ अ : सर्वसाधारण महिला,
८ ब : सर्वसाधारण,
९ अ : सर्वसाधारण महिला,
९ ब : नागरिकांचा मागास प्रवर्ग,
१० अ : नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,
१० ब : सर्वसाधारण

# हातोंड येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील हातोंड येथील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दि पिपल्स वेल्फेअर चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून आणि पोलीस हवालदार राजेंद्र वाघमारे यांच्या प्रयत्नातून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

अतिशय दुर्गम भागातील हातोंड येथे पहिली ते सातवीपर्यंतची शाळा आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. या गावचे सुपुत्र राजेंद्र रघुनाथ वाघमारे (पोलीस हवालदार) हे मागील सहा वर्षांपासून विद्यार्थ्यांना आणि शाळेला मदत करीत आहेत.



दि पिपल्स चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून आणि मुंबई पोलीस दलातील निरीक्षक अरुण डुंबरे, उपनिरीक्षक मिलिंद कुलकर्णी, हवालदार अनुष्का ढाले, खोपोलीतील व्ही. डी. एम. स्कूलचे चेअरमन उल्हासराव देशमुख यांच्या सहकार्यातून हातोंड शाळेतील विद्यार्थ्यांना खोपोलीतील यश क्लासचे डायरेक्टर प्रवीणकुमार, कांचन मॅडम, अर्चना वाघमारे आणि दिक्षा वाघमारे यांच्या हस्ते रेनकोट, छत्री, शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले. राजेंद्र वाघमारे, रोहिणी भांडीलकर, शिक्षक योगेश भांड, अंकुश काकरा यांच्यासह विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. मुख्याध्यापक अजित पाटील यांनी आभार मानले.

# ‘राष्ट्रकुल’चे शानदार उद्घाटन

## सिंधू, मनप्रितने केले भारतीय चमूचे नेतृत्व




**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

इंग्लंडमधील बर्मिंगहॅम शहरात आयोजित राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे शानदार उद्घाटन झाले. उद्घाटन सोहळ्यात बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू आणि भारतीय पुरुष हॉकी संघाचा कर्णधार मनप्रित सिंग यांनी भारतीय चमूचे नेतृत्व केले.

राष्ट्रकुल स्पर्धा २८ जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत खेळली जाणार आहे. गेल्या २० वर्षांत इंग्लंडमध्ये तिसऱ्यांदा या स्पर्धेचे आयोजन होत आहे. १९३०मध्ये सुरू झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची ही २२वी आवृत्ती असून या वेळच्या स्पर्धेत २८३ वेगवेगळ्या इव्हेंट्सचा समावेश करण्यात आलेला आहे. ७२ संघ विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होत आहेत. त्यासाठी सुमारे सहा हजार ५०० खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ बर्मिंगहॅममध्ये दाखल झाले आहेत.

भारत १८व्यांदा राष्ट्रकुल स्पर्धेत सहभागी होत असून २१५ खेळाडूंचा संघ दाखल झाला आहे. या स्पर्धेत भारताने आतापर्यंत १८१ सुवर्ण, १७३ रौप्य आणि १४९ कांस्यपदके जिंकली आहेत. २००२ मँचेस्टर गेम्सपासून प्रत्येक राष्ट्रकुल स्पर्धेत पदकांच्या बाबतीत भारत पहिल्या पाच देशांमध्ये समाविष्ट होत आला आहे.

दरम्यान, राष्ट्रकुल स्पर्धा उद्घाटन सोहळ्यापूर्वी बर्मिंगहम येथील व्हिलेजमध्ये भारताचा तिरंगा फडकविण्यात आला. या वेळी भारताचे काही खेळाडूदेखील उपस्थित होते. यात पुरूष आणि महिला हॉकी संघातील सदस्यांचा समावेश होता. याचबरोबर भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनचे भारी अध्यक्ष अनिल खन्ना, खजिनदार आनंदेश्वर पांडे, अनिल धुपार, स्पर्धा मिशनचे अधिकारी आणि भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होता. हा सोहळा संगीत आणि नृत्याच्या कार्यक्रमामुळे अधिकच रंगतदार झाला.

# विंडीजविरुद्ध आजपासून टी-२० मालिका रंगणार

**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

तीन सामन्यांच्या एकदिवसीय सामन्यात यजमान वेस्ट इंडिजला व्हाइटवॉश दिल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ शनिवार (दि. ३०)पासून विंडीजविरुद्ध पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. दोन देशांमधील ही मालिका टी-२० विश्वकरंडकाची रंगीत तालीम ठरणार आहे.

वेस्ट इंडिजने भारताविरुद्ध २०१७मध्ये टी-२० मालिका जिंकली होती. ही मालिका एका सामन्याची होती. त्यानंतर मात्र भारताने विंडीजविरुद्ध चार टी-२० मालिका जिंकल्या आहेत. दोन देशांमध्ये अखेरची टी-२० मालिका २०२१-२२मध्ये भारतात झाली. या मालिकेत यजमान संघाने ३-० अशा फरकाने घवघवीत यश संपादन केले. आता सलग दुसऱ्या मालिकेत विंडीजवर निर्भेळ यश संपादन करण्यासाठी टीम इंडियाचा संघ प्रयत्नशील असेल.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारतीय संघातील बहुतांशी प्रमुख खेळाडू क्रिकेटच्या मैदानात उतरणार आहेत. अपवाद विराट कोहलीचा. त्याने या मालिकेमधून माघार घेतली आहे. आगामी पाच सामन्यांमध्ये दीपक हुड्डाला त्याची जागा घेण्याची संधी असणार आहे. हुड्डाने या मालिकेत ठसा उमटवल्यास टी-२० विश्वकरंडकासाठी भारतीय संघाच्या यादीत त्याच्या नावाचा विचार होऊ शकतो.




### टीम इंडिया सज्ज

दुसरीकडे रवींद्र जडेजा अद्यापही पूर्णपणे फिट झालेला नाही. युजवेंद्र चहलला विश्रांती देण्यात आली आहे. वॉशिंग्टन सुंदर दुखापतीमुळे पुनरागमन करू शकलेला नाही. अशा परिस्थितीत रवीचंद्रन अश्विन या अनुभवी ऑफस्पिरनकडे टी-२० क्रिकेट प्रकारातील भारतीय संघातील स्थान पक्के करण्याची संधी असणार आहे. त्याच्यासमोर अक्षर पटेल, कुलदीप यादव व रवी बिश्नोईचे आव्हान असेल.

कर्णधार रोहित शर्माबरोबर पहिल्या लढतीत सलामीला कोणता फलंदाज येणार हा प्रश्न या वेळी उभा ठाकला आहे. के. एल. राहुल दुखापतीमुळे या मालिकेत खेळण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे त्याच्या अनुपस्थितीत इशान किशन व रिषभ पंत या डावखुऱ्यांमध्ये सलामीच्या जागेसाठी रस्सीखेच लागली आहे. अर्थात, सध्याचा फॉर्म बघता पंतलाच सलामीला खेळण्याची संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

# लिलावाआधी १९ खेळाडूंना १० संघांनी राखले कायम

**प्रो कबड्डी लीग**

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रो कबड्डी लीगच्या नवव्या हंगामासाठी ५ व ६ ऑगस्टला खेळाडूंची लिलाव प्रक्रिया होणार असून लिलावाआधी १९ विशेष खेळाडूंना १० संघांनी कायम राखले आहे.

तीन गटांमधून कायम राखलेल्या खेळाडूंची एकूण संख्या १११ इतकी आहे. याशिवाय १३ खेळाडूंना युवा गटातून आणि ३८ खेळाडूंना नव्या युवा गटातून संघांनी पुन्हा स्थान दिले आहे.

**कायम राखलेले खेळाडू :** बंगाल वॉरियर्स-मिणदर सिंग, मनोज गौडा, आकाश पिकलमुंडे; बंगळुरू बुल्स-महेंदर सिंग, मयूर कदम, जीबी मोरे; दबंग दिल्ली-विजय; गुजरात जायंट्स-सोनू; जयपूर पिक पँथस-अर्जुन देस्वाल, साहूल कुमार; पाटणा पायरेट्स-मोहम्मदरेझा शाडलोई, साजिन चंद्रशेखर, नीरज, मोनू; पुणेरी पलटण-सोमबिर, अबिनेश नदराजन; तमिळ थलायव्हाज-अजिंक्य पवार; यू मुंबा-रिकू; यूपी योद्धा-नितेश कुमार.

### महिला बिग बॅश लीगमध्ये पूजा वस्त्रकारचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला बिग बॅश लीगमध्ये भारतीय महिला संघाची स्टार ऑलराउंडर खेळाडू पूजा वस्त्रकार खेळणार आहे. लीगमधील ब्रिस्बेन हिटच्या फ्रँचायझीने तिचा समावेश आपल्या संघात केल्याची घोषणा केली आहे.

फ्रँचायझीने जारी केलेल्या एका निवदेनात म्हटले की, भारताची २२ वर्षीय ऑलराउंडर खेळाडू मागील ऑस्ट्रेलियाचा दौरा आणि आयसीसी एकदिवसीय विश्वचषकाच्या वेळी आमच्या नजरेत आली होती. तेव्हा संघाचे प्रशिक्षक शले नॉफके तिच्या शानदार खेळीमुळे खूप प्रभावित झाले होते.

# फुटबॉल स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे सुयश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी पनवेल येथील कर्नाळा क्रीडा अकादमीत झालेल्या जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत सहभाग घेऊन १७ वर्षाखालील वयोगटात व्दितीय क्रमांक पटकाविला.



या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी विद्यार्थिनींचे विशेष कौतुक व अभिनंदन केले तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सीकेटी विद्यालयात इन्वेस्टिचर समारंभ उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यमात इन्वेस्टिचर समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय हॅण्डबॉल खेळाडू तथा मुंबई युनिर्व्हसिटी विमेन्स हॅण्डबॉल कोच आणि एक उत्कृष्ट स्कूबा डायव्हर असलेले राजेंद्र सिंग आणि विद्यालयाची माजी विद्यार्थिनी तथा उत्कृष्ट अॅथेलिट स्नेहल पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाच्या शिक्षिका गायत्री सुरज यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुणे राजेंद्र सिंग यांनी मुलांना प्रोत्साहित करीत प्रत्येकाला आपापल्या करिअरमधील आवड जपण्याचा सल्ला दिला. कोणतेही एक धेय्य मनाशी पक्के करून त्याचा पाठलाग करत रहा, असे त्यांनी सांगितले.

माजी विद्यार्थिनी व अॅथेलीट स्नेहल पाटील हिने आपल्या शाळेतील गत आठवणींना उजाळा देत मुलांना खेळामध्ये जास्तीत जास्त सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. इयत्ता दहावीतील विद्यार्थी ध्रुव शर्मा व नेहा आगवेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्राथमिक मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पूर्व प्राथमिक (इंग्रजी) पर्यवेक्षिका संध्या अय्यर, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जागतिक शोतोकॉन स्पर्धेसाठी पनवेलच्या उर्वी जोशीची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये राहाणारी उर्वी विनायक जोशी हिची १ ते ७ ऑगस्टदरम्यान जपानच्या टोकियो शहरात होणाऱ्या १५व्या जागतिक शोतोकान स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल बावन बंगलो चेअरमन राहुल नाईक यांनी उर्वीचे अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

टोकियोत होणाऱ्या जागतिक शोतोकान स्पर्धेत उर्वी भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. यापूर्वी २०१९मध्ये जपानमध्ये झालेल्या जागतिक शोतोकान या मार्शल क्रीडा प्रकारात तिने कांस्यपदक पटकाविले होते. तिची चमकदार कामगिरी सुरूच आहे.

या वेळी उर्वीचे मार्गदर्शन अतुल बोरा व अन्य मान्यवर उपस्थित होते.



# टीम इंडियाने ड्रेसिंग रूममध्ये केला जल्लोष



**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत निर्भेळ यश मिळवले. शिखर धवनच्या नेतृत्वाखाली भारतीय युवा संघाने दमदार कामगिरी करून यजमानांचा ३-० असा पराभव केला. विजयानंतर भारतीय संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड आणि कर्णधार शिखर धवन खेळाडूंवर प्रचंड खूश आहेत. विजयानंतर सर्वांनी मिळून ड्रेसिंग रूममध्ये आनंदोत्सव साजरा केला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या जल्लोषाचा एक व्हिडीओ शेअर केला आहे.

बीसीसीआयच्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये राहुल द्रविड म्हणाला, हा संघ तरुण होता. इंग्लंडमध्ये खेळणारे फारसे लोक वेस्ट इंडिजमध्ये खेळत नव्हते, पण तुम्ही ज्या पद्धतीने कामगिरी केली ही संघासाठी चांगली बाब आहे. शाब्बास शिखर, तू खूप चांगले नेतृत्व केले.

यानंतर कर्णधार शिखर धवननेही संघाच्या मेहनतीचे कौतुक केले. मग विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला. या वेळी धवनने फिल्मी पद्धतीने घोषणा दिल्या. जेव्हा मी म्हणेल आपण कोण? तेव्हा तुम्ही सर्वांनी चॅम्पियन असे म्हणा, अशा सूचना त्याने खेळाडूंना दिल्या. ते ऐकून ड्रेसिंग रूममध्ये हशा पिकला. तिसऱ्या वनडेत पावसाने अनेकवेळा अडथळा आणला, पण शुबमन गिलची फलंदाजी आणि युझवेंद्र चहल, मोहम्मद सिराजच्या अप्रतिम कामगिरीमुळे भारताने विंडीजवर सहज विजय मिळवला.

# दिव्या ठाकूरचे मॅरेथॉन स्पर्धेत यश



**उरण : वार्ताहर**

जेएनपीए येथील सेंट मेरी स्कूलमधील विद्यार्थीनी दिव्या महेंद्र ठाकूर हिने नवीन पनवेल येथे आयोजित मॅरेथॉनमधे दुसरा क्रमांक तसेच पुणे मॅरेथॉनमधे चौथा क्रमांक मिळविला.

याबद्दल सेंट मेरी स्कूलचे प्रिन्सिपल राजेश अल्फान्सो, क्रीडा शिक्षक हरिश्चंद्र धोंडकर, लुक्की स्पोर्ट्स अकादमीचे लक्ष्मण पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन दिव्या ठाकूर हिचे कौतुक केले. त्याचप्रमाणे धुतूम ग्रामस्थांनी दिव्या व तिचे वडील महेंद्र ठाकूर यांचे अभिनंदन केले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com